कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३०४५१

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

सोमवार ०६ जुलै २०२६ | वर्ष : ६ | अंक : १८६ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Monday, 06 July 2026 | Year : 6 | Issue : 186 | Daily | Rate: Rs. 5/-

**दि. ०६ जुलै २०२६**



१९२७ –महाडच्या चवदार तळे सत्याग्रहानंतर समता आणि मानवी हक्कांच्या चळवळीस अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संघटनात्मक कार्याचा वेग वाढविला.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

# देशभरातील ५८ महाविद्यालये बंद; यादीत महाराष्ट्र टॉपवर

**नवी दिल्ली :** जर तुम्ही इंजिनिअरिंगचे विद्यार्थी असाल किंवा यावर्षी प्रवेश घेण्याचा विचार करत असाल, तर तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आणि तितकीच धक्कादायक बातमी आहे. देशभरातील तब्बल ५८ इंजिनिअरिंग आणि तंत्रशिक्षण महाविद्यालये Engineering Colleges बंद करण्याचा निर्णय 'ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन' (AICTE) ने घेतला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, महाविद्यालय बंद होण्याच्या या यादीत महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश दोघेही अव्वल स्थानी आहेत.

AICTE ने दिलेल्या माहितीनुसार, या ५८ महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून 'प्रोग्रेसिव्ह क्लोजर' म्हणजेच टप्प्याटप्प्याने बंद करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याशिवाय, विविध कॉलेजेस मधील तब्बल ९५० पेक्षा जास्त अभ्यासक्रम देखील कायमचे बंद करण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असले, तरी घाबरण्याचे कारण नाही. AICTE ने स्पष्ट केले आहे की, ज्या कॉलेजना 'प्रोग्रेसिव्ह क्लोजर' मंजूर झाले आहे, त्यांना यावर्षीपासून पहिल्या वर्षासाठी नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही. मात्र, जे विद्यार्थी आधीपासूनच तिथे शिकत आहेत, त्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्याची पूर्ण परवानगी असेल. त्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

AICTE ही देशातील तंत्रशिक्षणाचे नियमन करणारी सर्वोच्च संस्था आहे.




### महाविद्यालय बंद करण्यामागे खालील प्रमुख कारणं समोर आली आहेत.

१. अनेक कॉलेजेसमध्ये गेल्या काही वर्षांत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमालीची घटली होती.

२. नियमाप्रमाणे आवश्यक असलेले पात्र प्राध्यापक टिकवून ठेवण्यात महाविद्यालये अपयशी ठरलीत.

३. लायब्ररी, लॅब आणि इतर पायाभूत सुविधांच्या नियमांचे पालन न करणे.

जर एखादे महाविद्यालय पूर्णपणे बंद झाले, तर तिथल्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या कॉलेजमध्ये ट्रान्सफर केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना महाविद्यालयाचे स्टेटस तपासून घेणे गरजेचे आहे.

### महाराष्ट्र आणि युपीमध्ये सर्वाधिक फटका

**बंद झालेल्या ५८ संस्थांमध्ये खाजगी महाविद्यालयांची संख्या सर्वाधिक आहे. एकूण संस्थांपैकी फक्त ३ सरकारी अनुदानित आहेत, तर बाकी सर्व खाजगी आहेत. राज्यांचा विचार केला तर महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश मध्ये प्रत्येकी १२ महाविद्यालये बंद करण्यात आली आहेत. मध्य प्रदेशमध्ये ८ महाविद्यालये, तेलंगणा आणि पंजाब मध्ये प्रत्येकी ४ महाविद्यालये आंध्र प्रदेश आणि राजस्थान मध्ये प्रत्येकी ३ महाविद्यालये, गुजरात आणि कर्नाटक मध्ये प्रत्येकी २ महाविद्यालये याशिवाय पुणे, तामिळनाडू, हरियाणा, ओडिशा, उत्तराखंड आणि पश्चिम बंगालमध्ये प्रत्येकी १ कॉलेज बंद झाले आहे.**

# होट चोरी, सीट चोरी आणि चंदा चोरी', या तीन सूत्रांवर भाजपाचे राजकारण : काँग्रेस

**नवी दिल्ली :** अयोध्या येथील राम मंदिर निर्माणासाठी आलेल्या देणग्यांमध्ये मोठा घोटाळा झाल्याचा आरोप करत काँग्रेसने भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टिका केली आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी पत्रकार परिषद घेऊन, या संपूर्ण प्रकरणाला "भाजपा-आरएसएस इकोसिस्टमचा घोटाळा" म्हटले आहे. तसेच, या मुद्द्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या मौनावर त्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

जयराम रमेश भाजपाच्या राजकारणावर टीका करताना म्हणाले की, सध्या भाजपाचे राजकारण तीन सूत्रांवर चालत आहे. "व्होट चोरी, सीट चोरी आणि चंदा चोरी" या वादावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने दिलेल्या प्रतिक्रियेला रमेश यांनी "लाजीरवाणी" म्हटले आहे. स्वतःला प्रामाणिक आणि राष्ट्रवादी म्हणवून घेणारी संघटना इतक्या मोठ्या घोटाळ्यावर गंभीर पावले उचलण्यास अपयशी ठरली आहे, असा आरोप त्यांनी केला.

सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशीची मागणी मंदिरासाठी आलेल्या हजारो कोटी रुपयांच्या देणग्यांमध्ये अफरातफर झाल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. "या घोटाळ्याची चौकशी सर्वोच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींच्या देखरेखीखाली झाली पाहिजे आणि दोषींवर कठोर कारवाई व्हायला हवी," अशी मागणी जयराम रमेश यांनी केली. ते पुढे म्हणाले, "२२ जानेवारी २०२४ रोजी राम मंदिराच्या उद्घाटनाचे संपूर्ण श्रेय घेणारे पंतप्रधान मोदी आता या महाघोटाळ्यावर गप्प का आहेत? त्यांनी देशासमोर येऊन स्पष्टीकरण



दिले पाहिजे."

काँग्रेसने या देणगी घोटाळ्याचा संबंध भाजपाच्या जुन्या निवडणूक रोखे योजनेशी जोडला. सर्वोच्च न्यायालयाने ही योजना बेकायदेशीर ठरवली होती, याची आठवण करून देत रमेश म्हणाले की, "भाजपने आधी 'चंदा दो, धंदा लो' अंतर्गत शेकडो कोटी रुपये गोळा केले. त्यामुळे हा 'चंदा बिझनेस' भाजपच्या डीएनए मध्येच आहे."

श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे सदस्य भाजपा-आरएसएसशी जोडलेले आहेत. त्यामुळे या घोटाळ्याची माहिती प्रधानमंत्री, गृहमंत्री किंवा आरएसएसला नव्हती, यावर विश्वास ठेवणे अशक्य आहे, असेही काँग्रेसने म्हटले आहे.

उत्तर प्रदेश सरकारने नेमलेल्या विशेष तपास पथकाच्या प्राथमिक अहवालानंतर हा घोटाळा उघडकीस आला आहे. याप्रकरणी २५ जून रोजी एफआयआर नोंदवण्यात आला असून, आतापर्यंत पोलिसांनी ८ आरोपींना अटक केली आहे. तसेच आरोपींकडून सुमारे ८० लाख रुपयांची रोकड आणि विदेशी चलन जप्त करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

# व्हेनेझुएलामध्ये मृतांचा आकडा 1700 च्या वर

**नवी दिल्ली :** दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएलामध्ये 24 जून रोजी झालेल्या दोन शक्तीशाली भूकंपानंतर भारतानं मानवतावादी मदतीचा हात पुढे केला आहे. 'ऑपरेशन अमिस्ताद' अंतर्गत भारताने बचाव पथकं, फील्ड हॉस्पिटल, औषधं आणि अत्यावश्यक मदतसाहित्य व्हेनेझुएलाकडे रवाना केले असून भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी प्रयत्न अधिक तीव्र केले आहेत.

व्हेनेझुएलाच्या प्रशासनाने सोमवारी (29 जून) दिलेल्या माहितीनुसार, या भीषण भूकंपात आतापर्यंत 1,719 जणांचा मृत्यू झाला असून सुमारे 5,000 जण जखमी झाले आहेत. तसेच 12 हजारांहून अधिक नागरिक विस्थापित झाले आहेत.

### भारताकडून मदतकार्यात वाढ

मात्र, अद्याप बेपत्ता नागरिकांची अधिकृत संख्या जाहीर करण्यात आलेली नाही.

**'ऑपरेशन अमिस्ताद'अंतर्गत बचाव आणि मदतकार्याला वेग :** भारताच्या व्हेनेझुएलास्थित दूतावासानं आज मंगळवारी (30 जून) 'एक्स' वर पोस्ट करत सांगितलं की, 'ऑपरेशन अमिस्ताद' अंतर्गत भारतानं भूकंपग्रस्तांना मदत करण्यासाठी आपले प्रयत्न अधिक वेगानं सुरू ठेवले आहेत. बचावकार्याबरोबरच जखमींवर उपचार करण्यासाठी फील्ड हॉस्पिटल, औषधे आणि अन्य जीवनावश्यक साहित्यही पाठविण्यात आले आहे.



व्हेनेझुएलामध्ये बचाव आणि मदतकार्य युद्धपातळीवर सुरू असून ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्याचं काम अद्याप सुरू आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती स्थानिक प्रशासनाने व्यक्त केली आहे.

# आयएनएस मालवण' आणि 'आयएनएस महेंद्रगिरी' युद्धनौका लवकरच नौदलात सामील

**अमरावती :** भारतीय नौदलाच्या ताफ्यात लवकरच दोन अतिरिक्त युद्धनौका सामील होणार आहेत, ज्यामुळे नौदलाची सागरी क्षमता अधिक बळकट होईल. या पावलामुळे देशाच्या सागरी सुरक्षेला अधिक बळकटी मिळेल आणि त्या एका संरक्षक कवचाप्रमाणे काम करतील. भारतीय नौदल आपल्या किनारपट्टीवरील संरक्षण क्षमता सातत्याने वाढवत आहे. गेल्या महिन्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कोलकाता येथे एकाच वेळी तीन युद्धनौकांचे जलावतरण केले होते. आता भारतीय नौदलाचे अधिकारी 'आयएनएस महेंद्रगिरी' आणि 'आयएनएस मालवण' देशाला समर्पित करण्याच्या तयारीत आहेत. दोन्ही युद्धनौका लवकरच देशाला समर्पित केल्या जाणार : या वर्षी 20 जून रोजी कोलकाता येथे 'आयएनएस अग्रय', 'आयएनएस संशोधक' आणि 'आयएनएस द्रोणागिरी' (किंवा 'आयएनएस दुनागिरी') या नौका नौदलात अधिकृतपणे सामील करण्यात आल्या होत्या. या दोन विशिष्ट नौकांचा समावेश आधी नियोजित असला तरी तो अखेरीस पुढे ढकलण्यात आला होता. या महिन्यात त्या देशाला समर्पित केल्या जाण्याची शक्यता आहे. आयएनएस मालवण : 'आयएनएस मालवण'चे वर्गीकरण 'अँटी-सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट' (कमी खोलीच्या पाण्यात पाणबुडीविरोधी कारवाई करणारी नौका) असे करण्यात आले आहे. ही युद्धनौका कोचीन शिपयार्डमध्ये बांधण्यात आली आहे. भारतीय नौदलाने 30 एप्रिल 2019 रोजी शिपयार्डला याची ऑर्डर दिली होती. 30 नोव्हेंबर 2023 रोजी तिचे जलावतरण करण्यात आले. काम पूर्ण झाल्यानंतर 31 मार्च 2026 रोजी ती भारतीय नौदलाकडे सुपूर्द करण्यात आली. ही नौका 'ट्रिपल जेट वॉटर सिस्टम'चा वापर करून 25 नॉट्स वेगाने कार्यरत राहील. ती आधुनिक रडार, 'हल-माउंटेड' सेन्सर्स (नौकेच्या सांगाड्याला जोडलेले सेन्सर्स), हलक्या वजनाचे टॉर्पेडो आणि पाणबुडीविरोधी रॉकेट्सनी सुसज्ज असेल.



# पुराच्या पाण्यात अडकलेल्या एसटी बसमधील ८ प्रवाशांची रसायनी पोलिसांकडून सुखरूप सुटका

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पाताळगंगा नदीला आलेल्या पुरात कर्जत–पेण मार्गावरील एसटी बस अडकल्याची घटना रविवारी (५ जुलै) सारसई येथे घडली. बसमधील आठ प्रवाशांची रसायनी पोलिसांनी धाडसी बचावमोहीम राबवत सुखरूप सुटका केली.



पुराचे पाणी रस्त्यावर आल्याने बस अडकून पडली होती.

घटनेची माहिती मिळताच रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मुसळधार पाऊस आणि वाढता पाण्याचा प्रवाह यांची पर्वा न करता पोलिसांनी हेल्प फाउंडेशन, रसायनीच्या सदस्यांच्या सहकार्याने बचावकार्य सुरू केले. नियोजनबद्ध पद्धतीने बसमधील सर्व आठ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. यामध्ये ७२ वर्षीय ज्येष्ठ महिलेचीही सुखरूप सुटका करण्यात आली. एका पोलीस कर्मचाऱ्याने ज्येष्ठ महिलेला खांद्यावर घेऊन पुराच्या पाण्यातून सुरक्षितस्थळी आणल्याने उपस्थितांनी पोलिसांच्या धाडसाचे कौतुक केले.

या बचाव मोहिमेत कोणतीही जीवितहानी झाली नसून सर्व प्रवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवून त्यांच्या प्रकृतीची खातरजमा करण्यात आली. सुटका झालेल्या प्रवाशांनी आणि स्थानिक नागरिकांनी रसायनी पोलिसांचे आभार व्यक्त केले. दरम्यान, रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पुराचे पाणी असलेल्या रस्ते व पुलांवरून प्रवास टाळावा, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने पोलीस अथवा संबंधित यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहन रसायनी पोलिसांनी केले आहे.

# नागपुरातील एकाच कुटुंबातले पाच जण बेपत्ता

**नागपूर :** धंतोली पोलीस हद्दीतील बलराज मार्गावर दुर्गा सदन येथील रहिवासी एकाच कुटुंबातील पाच जण अचानक बेपत्ता झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. गेल्या महिन्यात २४ जूनला घर सोडून निघून गेलेल्या कुटुंबातील कोणाचाही संपर्क होत नसल्याने भावाने अखेर शनिवारी धंतोली पोलीस ठाणे गाठत तक्रार दाखल केली.

हर्षा सुरेश परसवानी (५७), जितेंद्र सुरेश परसवानी (४२), ईशिता जितेंद्र परसवानी (४०), खुषी जितेंद्र परसवानी (२१), कृष्णा जितेंद्र परसवानी (१२) अशी घर सोडून अचानक बेपत्ता झालेल्या कुटुंबातील सदस्यांची नावे आहेत.

नेमके कारण काय? ते नेमके कशामुळे घर सोडून गेले, कर्जबाजारीपणामुळे पैसे वसुलीसाठी त्यांना कोणी त्रास देत होता का, की यामागे काही घातपात आहे, याचा कसलाही उलगडा अद्याप झालेला नाही. परवानी कुटुंबातील तक्रारदार भावाला देखील कर्जाबद्दल कसलीही माहिती नसल्याने पाच जणांच्या बेपत्ता होण्या मागे नेमके कारण काय याचे कोडे पोलिसांना पडले आहे. गेल्या दहा दिवसांपासून भाऊ आणि त्याच्या कुटुंबातील कोणाचाही संपर्क होत नव्हता. त्यामुळे भाऊ श्यामसुंदर परसवानी (७१) यांनी धंतोली पोलीस ठाणे गाठत शनिवारी रात्री तक्रार दाखल केली. पोलिसांनी भ्रमणध्वनींवर संपर्क साधला असता सर्वांचे फोन बंद होते. त्याचे शेवटचे लोकेशन तपासले असता ते पुणे येथे आढळले. परसवानी कुटुंबातील काही नातेवाईक पुणे येथे राहतात. पोलिसांनी त्यांच्याशी देखील संपर्क साधला. मात्र त्यांनी ते आपल्याकडे आले नसल्याचे सांगितल्याने गुढ निर्माण झाले आहे.



### सर्वांचे फोन बंद, शेवटचे लोकेशन पुणे

धंतोली येथील रहिवासी या कुटुंबातील कर्ता पुरुष सुरेश परसवानी यांचे काही दिवसांपूर्वीच निधन झाले होते. सुरेश यांच्या पत्नी हर्षा, मुलगा जितेंद्र, सून इशिता आणि त्यांचा मुलगा देखील कोणाशी मनमोकळेपणाने बोलत नव्हते. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून हे कुटुंब खचल्याने नैराश्य आणि चिंतेत होते. दरम्यान सुरेश यांच्या मोठ्या भावाने कुटुंबातील पाच जण अचानक बेपत्ता झाल्याची तक्रार आल्यानंतर पोलिसांनी परिसरातील नागरिकांची विचारपूस केली. त्यावेळी ही माहिती समोर आले.

# भारतीय पासपोर्टची १२५ व्या स्थानावर घसरण

**नवी दिल्ली :** भारतीय पासपोर्ट हे नागरिकत्व सिद्ध करणारे दस्तऐवज मानले जाऊ शकत नाही, असं परराष्ट्र मंत्रालयाने काही दिवसांपूर्वी म्हटले होते. त्यावरून वाद-विवाद सुरू असून अनेक वेगवेगळे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या चर्चा सुरू असतानाच आता एक मोठी बातमी समोर आली आहे. भारताची पासपोर्टच्या रँकिंगमध्ये घसरण झाली असून पहिल्या १०० देशांच्या यादीतून भारत बाहेर गेला आहे.

ग्लोबल सिटिझन सोल्युशन्सद्वारे प्रकाशित (पारपत्र निर्देशांक) एक अहवाल नुकताच समोर आला आहे. ग्लोबल पासपोर्ट इंडेक्सच्या २०२६ च्या आकडेवारीनुसार, भारतीय पासपोर्ट १२५ व्या स्थानावर गेला आहे. या अहवालानुसार, भारताची पासपोर्ट रँकिंगमध्ये घसरण झाली असून भारत आता १२५ व्या स्थानावर गेला आहे. तसेच पासपोर्ट रँकिंगमध्ये युरोपचा दबदबा कायम असल्याचे दिसून आले आहे.

२०२५ मधील रँकिंगच्या तुलनेत भारताची आता एका स्थानाने घसरण झाली आहे. या अहवालानुसार, नामिबिया भारताच्या पुढे म्हणजे १२४ व्या स्थानावर, तर अझरबैजान भारताच्या मागे म्हणजे १२६ व्या स्थानावर आहे.




**ग्लोबल पासपोर्ट इंडेक्सच्या अहवालानुसार, १९७ देशांच्या यादीत भारताला १२५ वं स्थान मिळालं. तसेच २०२५ मध्ये भारत १२४ व्या स्थानावर होता. मागील वर्षाचा विचार केल्यास या वर्षी भारताची घसरण झाली असली तरी २०२१ मधील १२७ व्या स्थानाच्या तुलनेत भारताची काहीसी सुधारणा झाली आहे.**

अहवालानुसार, भारतीय पासपोर्टद्वारे २६ देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवेश मिळतो. भारतीय पासपोर्टधारक हे भूतान, जमैका, नेपाळ, पॅलेस्टाईन, ट्युनिशिया, अंगोला या सारख्या देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवास करू शकतात. किंवा तिथे पोहोचल्यावर व्हिसा (व्हिसा ऑन अरायव्हल) मिळवू शकतात. तसेच अमेरिका, युनायटेड किंगडम, जर्मनी, फ्रान्स, चीन, संयुक्त अरब अमिराती यांसारख्या ८८ देशांना भेट देण्यासाठी भारतीय नागरिकांना अजूनही व्हिसाची आवश्यकता असते.

सामान्य राहणीमान, निष्ठावान समाज कार्य !
नि:स्वार्थ, उत्कृष्ठ संघटक, आंबेडकरी विचारांचे गाढे अभ्यासक!! हीच यांची खरी ओळख!!!
70 वर्षाचा स्वस्थ व आनंदमय जीवन प्रवास
इंजि. अविनाश कठाणे




6 जुलै 2026
शुभेच्छुक
आयु. विनोदीनी कठाणे, इंजि. शिल्पक कठाणे
आयु.श्रुती कठाणे-गजभिये बहरीन, आयु. रक्षंदा कठाणे, आयु. शैलेंद्र गजभिये -बहरीन, डॉ. विकास कठाणे - सावन्तवाडी, चि. विआन, कु. नक्षत्रा, चि. तृषल, व मित्र परिवार, ब्ल्यू क्लब विमानतळ परिसर, दैनिक बहुजन सौरभ, बुद्ध विहार समन्वय समिती, भारतीय बौद्ध महासभा, मानव अधिकार संरक्षण मंच, समता सैनिक दल, बानाई नागपूर



“ वेळ आणि शब्द एकदा गेल्यावर परत येत नाहीत... ”



## संपादकीय

# निष्काळजीपणाचा बळी ठरलेले दहा शांतिदूत

थायलंडमध्ये घडलेली एक दुर्घटना केवळ एका देशापुरती मर्यादित नाही. ती संपूर्ण जगाला अंतर्मुख करणारी आहे. एका अल्पवयीन मुलाच्या हातात विनापरवाना पिकअप ट्रक देण्यात आला आणि काही क्षणांत दहा बौद्ध भिक्षूंचे प्राण गेले. करुणा, शांती आणि अहिंसेचा संदेश देणाऱ्या या भिक्षूंना रस्त्यावर अशा प्रकारे मृत्यूला सामोरे जावे लागणे ही मानवतेच्या इतिहासातील एक अत्यंत वेदनादायी घटना आहे. प्रश्न केवळ एवढाच नाही की वाहन कोण चालवत होते. खरा प्रश्न असा आहे की, एका अल्पवयीन मुलाच्या हातात एवढ्या मोठ्या वाहनाचे सुकाणू गेलेच कसे? समाज म्हणून आपण कुठे चुकतो आहोत? पालकांची जबाबदारी, कायद्याची अंमलबजावणी, प्रशासनाची दक्षता आणि नागरिकांची सामाजिक जाणीव या सर्व बाबींचे गंभीर आत्मपरीक्षण करण्याची वेळ या घटनेने आणली आहे. अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्याची परवानगी देणे ही अनेक ठिकाणी प्रतिष्ठेची बाब मानली जाते. काही पालक मुलांच्या हट्टापायी कायद्याचे उल्लंघन करतात, तर काही जण त्याचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर अभिमानाने प्रसारित करतात. हा अभिमान नसून समाजासाठी धोक्याची घंटा आहे. वाहन चालविणे हा अधिकार नसून जबाबदारी आहे. त्यासाठी परिपक्वता, संयम, प्रशिक्षण आणि कायदेशीर पात्रता आवश्यक असते. या घटनेतील सर्वाधिक वेदनादायक बाब म्हणजे मृत्यू पावलेले भिक्षू. समाजात शांततेचा संदेश देणाऱ्या, आध्यात्मिक जीवन जगणाऱ्या आणि मानवकल्याणासाठी स्वतःला वाहून घेणाऱ्या व्यक्तींचा असा अंत कोणत्याही संवेदनशील मनाला अस्वस्थ करणारा आहे. एका क्षणातील निष्काळजीपणाने हजारो अनुयायांचे आणि संपूर्ण समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे या प्रकरणात पोलिसांनी तातडीने गुन्हा नोंदविल्याचे वृत्त समोर आलेले नाही. कोणतीही दुर्घटना घडल्यानंतर न्यायव्यवस्थेने वेगाने आणि निष्पक्षपणे कार्य करणे अपेक्षित असते. न्यायाला विलंब म्हणजे जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होण्याचा धोका. कोणताही व्यक्ती, त्याचे वय किंवा सामाजिक स्थान काहीही असो, कायद्यापुढे सर्व समान असले पाहिजेत. जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई होणे हीच भविष्यातील दुर्घटनांना आळा घालण्याची पहिली पायरी आहे. भारतासाठीही ही घटना मोठा धडा आहे. आपल्या देशातही अल्पवयीन मुलांकडून दुचाकी, कार आणि इतर वाहने चालविण्याच्या घटना वारंवार समोर येतात. काही वेळा अशाच निष्काळजीपणामुळे निरपराध नागरिकांना प्राण गमवावे लागतात. कायदे आहेत, शिक्षा आहेत; परंतु त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि सामाजिक जागृती यांचा अभाव अजूनही जाणवतो. रस्ते हे वेग दाखविण्याचे मैदान नसून सार्वजनिक जीवनवाहिनी आहेत. तेथे प्रत्येक वाहनचालकाच्या निर्णयावर अनेकांचे जीवन अवलंबून असते. म्हणूनच पालक, शाळा, समाज आणि शासन यांनी मिळून जबाबदार नागरिक घडविण्याची गरज आहे. मुलांच्या हातात वाहनाचे सुकाणू देण्यापूर्वी त्यांच्या हातात जबाबदारीचे संस्कार देणे अधिक महत्त्वाचे आहे. दहा बौद्ध भिक्षूंच्या मृत्यूमुळे निर्माण झालेली वेदना केवळ थायलंडची नाही; ती संपूर्ण मानवजातीची वेदना आहे. या दुःखद घटनेतून जर जगाने निष्काळजीपणाला नकार देण्याचा आणि वाहतूक शिस्तीला जीवनमूल्य म्हणून स्वीकारण्याचा निर्धार केला, तर त्या दहा भगव्या वस्त्रांतील शांतिदूतांना तीच खरी आदरांजली ठरेल. या दुःखद घटनेतून जर जगाने निष्काळजीपणाला नकार देण्याचा आणि वाहतूक शिस्तीला जीवनमूल्य म्हणून स्वीकारण्याचा निर्धार केला, तर त्या दहा शांतिदूतांना तीच खरी आदरांजली ठरेल.●●

# आंबेडकरी चळवळीतील पांढऱ्या केसांची नैतिक जबाबदारी!

**भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते मानवतेच्या मुक्तीसाठी अखंड झटणारे युगपुरुष होते. त्यांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण हा समाजाच्या उन्नतीसाठी अर्पण केला.**



स्वतःच्या सुखाचा, आरामाचा आणि आरोग्याचा विचार न करता त्यांनी ज्ञान, संघर्ष आणि त्यागाचा असा दीप प्रज्वलित केला की त्याचा प्रकाश आजही कोट्यवधी वंचितांच्या जीवनाला दिशा दिली आहे. त्यांच्याच बलिदानाने आज आपण ज्येष्ठ नागरिक म्हणून समाजात मानाचे स्थान मिळवले आहे. आपल्या केसांवर आलेले पांढरेपण हे केवळ वयाचे प्रतीक नसून अनुभव, संघर्ष आणि जीवनज्ञानाचे प्रतीक आहे. परंतु हा अनुभव समाजाच्या उपयोगी पडला नाही, तर त्याचे मूल्य कमी होते. आजची तरुण पिढी अनेक प्रश्नांशी झुंज देत आहे. त्यांना केवळ सल्ल्याची नाही, तर आपल्या अनुभवातून मिळणाऱ्या दिशादर्शनाची गरज आहे. आपण त्यांच्यासाठी प्रेरणास्थान बनलो पाहिजे, तरच आपल्या आयुष्याची खरी कमाई ठरेल. आपण आयुष्यभर शासकीय सेवा, नोकरी, व्यवसाय किंवा विविध क्षेत्रांमध्ये कार्य करून आपल्या कुटुंबाला सुख, सुरक्षितता आणि स्थैर्य दिले. आपल्या कष्टामुळे आज आपण समाधानाचे जीवन जगत आहोत. परंतु आता जीवनाच्या या उत्तरार्धात एक प्रश्न स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. आपण समाजासाठी काय केले? आज आपल्या समाजात विविध प्रकारच्या सामाजिक शैक्षणिक व आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत. विशेषतः आंबेडकरी वस्त्यां विकासाच्या प्रतीक्षेत आहेत. अनेक भागांत मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे आर्थिक दृष्ट्या गरीब दुर्लभ असलेल्या लोकांना त्रास होतो आहे. महत्त्वाचे आपल्या पुढील पिढीसमोर शिक्षण, रोजगार, सामाजिक ऐक्य आणि विकासाची अनेक आव्हाने उभी आहेत. त्यात भरीस-भर म्हणुन एसआयआर सध्या महाराष्ट्र राज्यात गावोगावी, शहरांमध्ये, खेड्यापाड्यांत आणि ग्रामीण भागात हे अभियान सुरू करण्यात आले आहे. मात्र, अनेक नागरिकांना याचे महत्त्व, उद्दिष्टे आणि त्यातील स्वतःची भूमिका याबाबत पुरेशी माहिती नाही. राज्यकर्त्यांनी आपल्याला उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत गुंतवून तिकडे एसआयआर ची अंमलबजावणी सुरू करून आपणास वेठीस धरले आहे. आंबेडकरी समाज कसा नेस्तनाबूत होईल याची पुरेपूर काळजी घेऊन करण्यात आलेली आहे. एसआयआर च्या मदतीने आपले नागरिकत्व काढून घेण्याचा डावपेच सुरू आहेत. त्यामुळे आपल्या सारख्या प्रत्येक जेष्ठ व सुजाण नागरिकाने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग होवून जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. अशा वेळी आपल्या अनुभवाची, मार्गदर्शनाची आणि नेतृत्वाची समाजाला नितांत गरज आहे.

आपण अनेक वर्षे शासन, प्रशासन, शिक्षण, उद्योग, बँका, रेल्वे, आरोग्य सेवा आणि विविध क्षेत्रांमध्ये कार्य केले आहे. त्या अनुभवाची शिदोरी आज समाजाच्या कामी आली पाहिजे. निवृत्ती म्हणजे कार्याचा शेवट नसून समाजासाठी नव्या जबाबदारीची सुरुवात आहे. समाजातील अनेक प्रश्नांवर आपण फक्त चर्चा करतो, चिंता व्यक्त करतो; परंतु चिंतेचे रूपांतर कृतीमध्ये झाले पाहिजे. कारण इतिहास घडवणारे लोक प्रेक्षक नसतात, ते सहभागी असतात. आज समाजाला देण्यासारखी सर्वात मोठी गोष्ट म्हणजे आपला वेळ, आपला अनुभव आणि आपले मार्गदर्शन. ही संपत्ती कोणत्याही पैशापेक्षा अधिक मौल्यवान आहे. यासाठी समाजाला उपदेश देण्यापेक्षा समाजासाठी आदर्श बनणे अधिक महत्त्वाचे आहे . आज मोबाईलच्या माध्यमातून आपण दररोज “जयभीम”, “नमो बुद्धाय”, “धम्म सकाळ” अशा शुभेच्छा पाठवतो, अनेक संदेश फॉरवर्ड करतो. वाढदिवसानिमित्त लग्नदिवसा निमित्ताने छोट्या मोठ्या मैफिली करतो, पिकनिका करतो मनमुराद आनंद साजरा करतो. मान्य आहे कि हे सगळं आवश्यक आहे तरी पण एक क्षण थांबून विचार करू या सर्वातून प्रत्यक्ष समाजकार्य किती घडते? फक्त संदेश पाठवून समाजपरिवर्तन होत नसते. त्यासाठी प्रत्यक्ष कृती, सहभाग आणि बांधिलकी आवश्यक असते. वास्तविक समस्त जेष्ठमंडळी असेच करतात असं नाही काही अपवाद सुद्धा आहेत परंतु त्याची टक्केवारी फारच कमी आहे ती टक्केवारी कशी वाढेल याचा विचार करावा लागेल. ज्यांनी आयुष्यभर माणसे जोडली, त्याचे वृद्धत्व कधीच एकाकी पडत नसते हे सत्य नाकारता येत नाही. म्हणूनच आपण सर्व ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या मनातील हेवेदावे, गैरसमज, मतभेद आणि अहंकार बाजूला ठेवा. आपण एकत्र येऊ शकतो, समाजासाठी कार्य करू शकतो, फक्त त्यासाठी आपली प्रामाणिक इच्छा असणे आवश्यक आहे ती स्वतःत निर्माण करा. मतभेद असणे ही स्वाभाविक बाब आहे. पण मतभेदांचे रूपांतर मनभेदात होऊ देऊ नका. काही प्रश्न असतील, काही नाराजी असेल तर समोरासमोर बसून चर्चा करा, संवाद साधा आणि त्यातून मार्ग शोधा. कारण संवादातूनच समाज घडतो आणि एकता निर्माण होते. बाबासाहेबांचे जीवन आपल्याला शिकवते की महानता जन्माने मिळत नाही, ती त्याग, परिश्रम आणि ध्येयनिष्ठेने प्राप्त होते. त्यांनी स्वतःच्या आयुष्याची होळी करून लाखो लोकांच्या जीवनात प्रकाश निर्माण केला. म्हणूनच बाबासाहेबांचे स्मरण म्हणजे केवळ त्यांच्या प्रतिमेला अभिवादन नव्हे, तर त्यांच्या विचारांना आणि कार्याला आपल्या जीवनात उतरविण्याची प्रतिज्ञा होय. ज्येष्ठ नागरिकांचे खरे सामर्थ्य त्यांच्या अनुभवात नसून, त्या अनुभवातून निर्माण होणाऱ्या संवेदनशीलतेत असते. ज्येष्ठत्व हे वयाने मिळते, पण मोठेपण हे आपल्या वागण्याने मिळते हे विसरू नका. जीवनाच्या उत्तरार्धात खरा आनंद पद, पैसा किंवा प्रतिष्ठेत नसून माणुसकीत आणि आपुलकीत असतो. मीपणा माणसांना दूर करते, तर माणुसकी माणसांना जवळ आणते. मीच बरोबरच आहे, हा हट्ट सोडा; दुसऱ्याचेही ऐका. संवादातूनच नाती जिवंत राहतात. वय वाढते तेव्हा अनुभव वाढतो, पण कधीकधी “मी”, “माझे”, “माझ्यामुळे” हा अहंकारही नकळत वाढू लागतो. माझ्या मते आपल्या यशाचा अभिमान निश्चितच असावा, पण दुसऱ्याच्या यशाचा आनंदही तितक्याच मनापासून साजरा करता आला पाहिजे. आपल्या अनुभवांचा गर्व न करता तो पुढील पिढीला देणे, हीच खऱ्या ज्येष्ठत्वाची ओळख आहे हे विसरू नका वृद्धत्व म्हणजे जीवनाचा सूर्यास्त नव्हे; तर इतरांसाठी प्रकाश देण्याची सुवर्णसंधी आहे. कदाचित हे विचार वाचून काहीना अस्वस्थ वाटेल. पण हा कोणावर टीका करण्याचा प्रयत्न नाही. उलट आपल्या सर्वांच्या मनातील सुप्त सामाजिक जाणीव जागृत करण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. जीवनाच्या या टप्प्यावर आपण काय कमावले यापेक्षा, आपण समाजाला काय दिले, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. कारण संपत्ती, पद आणि प्रतिष्ठा यांची मर्यादा असते; परंतु समाजासाठी केलेले कार्य आणि निर्माण केलेली माणसे हीच खरी अमर संपत्ती असते. “मी” पासून “आपण” कडे जाणारा प्रवासच समाजनिर्मितीचा पाया असतो. हे ब्रीद लक्षात घेऊन आपण सर्वांनी ‘मी’ पासून ‘आपणा’ चा प्रवास करू, तरच समाज अधिक सुसंस्कृत, स्नेहपूर्ण आणि एकजूट होईल. आपण सर्व ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे मार्गदर्शक दीपस्तंभ आहोत. त्यांनी अहंकार नव्हे तर माणुसकीचा प्रकाश पसरवावा. अनुभवाचे सामर्थ्य आणि एकतेची ताकद घेऊन विकासासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी पुन्हा एकदा खांद्याला खांदा लावून उभे राहू या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रात्रंदिवस अभ्यास, लेखन, चिंतन आणि समाजकारण यामध्ये ते इतके तल्लीन असत की अनेकदा त्यांना जेवणाची, विश्रांतीची किंवा स्वतःच्या प्रकृतीचीही जाणीव राहत नसे. शरीर थकले होते, आजारांनी घेरले होते, पण मन मात्र समाजाच्या उद्धाराच्या ध्येयाने सदैव जागृत होते.त्यांच्याच कर्तृत्वाने आपल्याला खूप काही मिळाले आहे. आता आपल्याला समाजाचे ऋण फेडण्याची वेळ आली आहे.



**नरेश साखरे**
**मो. 9923086515**

आपल्या आयुष्याचा उत्तरार्धात मीपणा सोडू या, माणुसकी जोडू या; ज्येष्ठत्वाला समाजसेवेचे रूप देऊ या चला, आज एक संकल्प करूया “मी समाजाकडून काय घेऊ शकतो?” यापेक्षा “मी समाजाला काय देऊ शकतो?” हा विचार आपल्या जीवनाचा केंद्रबिंदू बनवूया. कारण शेवटी आपल्या जाण्यानंतर लोक आपल्या संपत्तीची नव्हे, तर आपल्या कार्याची आणि माणुसकीची आठवण ठेवतात.●●

# टी.बी गोल्हर काळाच्या पडद्याआड



लोकमत दैनिकात रूजू झाल्यावर मी या संघटनेचा सभासद झालो होतो. टी. बी. गोल्हर, म. प्र. उपाध्य डॉ. बाबासाहेब अंधारे, प्रकाश देशपांडे, दिनदयाल पुरोहित, विजय सातोकर, सिद्धार्थ सोनटक्के, जोसेफ राव, विश्वास इंदूरकर, बबन वाळके, प्रदीप मैत्र, गणेश शिरोळे, लक्ष्मणराव जोशी जैमिनी कडू, राजू मिश्रा, अनिल महात्मे, सीताराम कोठीवाले,भूपेंद्र गणवीर, सुनील चावके, रमेश मारूळकर, प्रभाकर दुपारे, अरूण आसटकर अशी दिग्गज मंडळी या संस्थेशी जुळली होती. तेव्हा टिळक पत्रकार भवन एका लहानशा टिनाच्या शेडमधे होते. याच पत्रकार मंडळीच्या प्रयत्नातून पत्रकार सहनिवास ही वसाहत साकार झाली. पत्रकारांच्या वेतन निश्चितीसाठी गठीत झालेल्या बछावत वेतन आयोग, मनिसाना वेतन आयोगापुढे नागपूरच्या या लढाऊ पत्रकारांनी पत्रकारांची बाजू लावून धरली होती. देशपातळीवर नागपूर श्रमिक पत्रकार संघ ही संघटना लढाऊ संघटना म्हणून नावारूपास आली होती. टिळक पत्रकार भवन ही देखणी वास्तू उभी करण्यात या लोकांना खूप मोलाचा वाटा होता. एका टिनाच्या शेडमधे असलेल्या नागपूर श्रमिक पत्रकार संघाची देखणी वास्तू उभी करण्यात या मंडळीचे मोलाचे कष्ट होते. या सर्व लढ्यात गोल्हर साहेबांचा मोठा सहभाग होता. ते इंग्रजीचे उत्तम जाणकार होते. युएनआय या वृत्त संस्थेचे ते ब्युरो चीफ होते. अशा या प्रामाणिक, निष्कलंक आणि लढाऊ पत्रकाराच्या जाण्याने या क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. गूड बाय गोल्हर साहेब!●●

> **नागपूर श्रमिक पत्रकार संघाला सोन्याचे दिवस दाखवणारे पत्रकार या साखळीत एक ज्येष्ठ पत्रकार टी.बी.गोल्हर होते. ऐंशीच्या दशकात मी या क्षेत्रात आलो.**

**जयंत नरांजे**
**मो.9423634829**
**ह.मु.पुणे.**

# जयभीम’ संविधान आणि सामाजिक आचरण

**अयोध्येतील राममंदिरात झालेल्या चोरीच्या घटनेने पुन्हा एकदा समाजात नैतिकता, प्रामाणिकपणा आणि सार्वजनिक आचरण याविषयी चर्चा सुरू झाली आहे. एखाद्या व्यक्तीने किंवा काही व्यक्तींनी गुन्हा केला म्हणून संपूर्ण धर्म, समाज किंवा समुदायाला दोष देणे योग्य नाही. गुन्हेगाराची ओळख त्याच्या कृत्यावरून ठरते, धर्मावरून नाही.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर धम्मदीक्षा घेताना दिलेल्या बावीस प्रतिज्ञांचा मूलभूत संदेश म्हणजे विवेक, समता, बंधुता, अंधश्रद्धेचा त्याग आणि नैतिक जीवन. या प्रतिज्ञांचा उद्देश कोणत्याही समाजाविषयी द्वेष निर्माण करणे नव्हता, तर माणसाला विचारशील, जबाबदार आणि मानवतावादी बनवणे हा होता. भारतीय संविधानातही समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय हीच मूल्ये केंद्रस्थानी आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य एखाद्या जातीपुरते किंवा समाजपुरते मर्यादित नसून ते संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. आज जगभर त्यांची ओळख मानवतावादी, समतावादी आणि महान संविधानकार म्हणून आहे. आंबेडकरी विचार म्हणजे केवळ एका विशिष्ट समाजाची ओळख नव्हे. जो कोणी संविधानातील मूल्यांवर विश्वास ठेवतो, विवेकाचा स्वीकार करतो, अंधश्रद्धेला नाकारतो आणि मानवतेला सर्वोच्च मानतो, तो आंबेडकरी विचारांचा वाहक ठरतो. इतिहासातील अनेक धार्मिक स्थळांबाबत विविध मते, संशोधन आणि दावे मांडले जातात. अशा विषयांवर चर्चा करताना ऐतिहासिक पुरावे, न्यायालयीन निर्णय आणि संशोधनाचा आधार घेणे आवश्यक आहे. मतभेद असले तरी ते संविधानिक आणि लोकशाही मार्गानेच मांडले गेले पाहिजेत. बौद्ध धम्मातील पंचशील माणसाला नैतिक जीवनाचा मार्ग दाखवतात. त्यातील अदिन्नादाना वेरमणी सिक्खापदं समादियामि म्हणजे मी चोरी करणार नाही आणि दुसऱ्याच्या परवानगीशिवाय त्याची वस्तू घेणार नाही, हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. समाजातील प्रत्येक नागरिकाने हा आदर्श स्वीकारल्यास भ्रष्टाचार, चोरी आणि लूटमार यांसारख्या प्रवृत्ती कमी होतील. तसेच पाणातिपाता वेरमणी सिक्खापदं समादियामि या प्रतिज्ञेत कोणत्याही सजीव प्राण्याविषयी हिंसा न करण्याचा संदेश आहे. बौद्ध धम्माचा हा मानवतावादी दृष्टिकोन समाजात करुणा, सहिष्णुता आणि शांततेचा मार्ग दाखवतो. भारतातील सर्व नागरिकांनी संविधानाचा आदर करणे, कायद्याचे पालन करणे आणि सार्वजनिक जीवनात नैतिकता जपणे ही काळाची गरज आहे. कोणत्याही धर्माच्या किंवा विचारसरणीच्या नावाखाली भ्रष्टाचार, हिंसा, अंधश्रद्धा किंवा गुन्हेगारीचे समर्थन होऊ नये. आज भारताची ओळख संविधान, लोकशाही आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या समतेच्या विचारांमुळे जगभर निर्माण होत आहे. त्यामुळे समाजात वैमनस्य नव्हे तर बंधुभाव, द्वेष नव्हे तर संवाद आणि अंधश्रद्धा नव्हे तर विवेक यांचा प्रसार करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.●●





**अनिरुद्ध शेवाळे**
**9823368332**

# हिंदू राष्ट्राच्या मगर मिठीतून मुक्तीसाठी बहुजन राष्ट्र विचार





**नागेश चौधरी ( बहुजन विचारवंत )**
**9970873560**

**भारतीय बहुजनांची पिळवणूक, शोषण, दमन हे तोवर थांबू शकत नाही जो पर्यंत बहुजन हिंदुराष्ट्रवाद्यांच्या गुलामगिरीतून मुक्त होणार नाही. हिंदुराष्ट्र ही संकल्पना केवळ आर्थिक शोषण नाही. हिंदुराष्ट्र म्हणजे संपूर्ण ब्राम्हणेतरांचे दुय्यमत्व, सर्वच बाबतीमधल, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, भाषिक आणि त्यांचे सार्वत्रिक निर्वासीतीकरण. ते आपल्याच भूमीत उखडलेले, निराधार झालेले, परांगदा झालेले आहेत. त्यांना भाषेतून मुके करण्यात आले. त्यांच्या भूमीवर मालकी करण्यात आली. त्यांचे मानवी जीवन वा माणूसपण घालवण्यात आलेले, त्यांना जनावरे, माकडे वा त्याही पेक्षा खाली समजण्यात आले, आर्थिक दशा तर त्यामुळे अशी करण्यात आली की त्यांनी फक्त कष्टात, क्षण न क्षण मरण जवळ करत जगावे.**

भीक मागत, रानोमाळ भटकत, शेतीत राबराबत, वनवास भोग भोगत. त्यांची संस्कृती, त्यांची भाषा, त्यांचे शिक्षण पार नष्ट करण्यात आले. ते माणूस म्हणून जगण्याच्या लायकीचे नाहीत हे सांगण्यात आले. त्यांचे सारे सारे हिरावून घेण्यात आले. जे वर बसले, ज्यांनी हे सारे हिरावले त्यांनी गुलामीचे, वर्चस्वाचे पाश एवढे घट्ट आवळले की सारे पाश सोडवण्यासाठी, त्या पाशातून सुटण्यासाठी त्यांना हतबुद्ध करण्यात आले. सर्वस्व गमावलेल्यांनी कुठून सुरुवात करावी असा प्रचंड पेच निर्माण करुन ठेवला. मग ज्यांनी हे सारे केले त्यांनीच यातून सुटण्याचे फसवे मार्गही सांगितले. आधी भक्ती करायला लावले, शरीर व्यर्थ आहे, मोक्षच काय तो मिळवायला हवा. राग येवू नये म्हणून अनेक भुलभुलैये निर्माण केले. इतिहास काळापासून आजवर, येथवर. या अमानुषांना मानवता शिकवण्यासाठी जे जे त्यांच्या नंतरचे परकीय या भूमीवर आलेत, त्यांच्या सुधारणा, त्यांची व्यवस्था यांच्या पेक्षा श्रेष्ठ होती म्हणून त्या पचवून पुन्हा इथल्या मूळलोकांना खालीच ठेवण्याचे कसब करत राहले, रचत राहले. मुस्लिम, इंग्रज यांच्या श्रेष्ठ व्यवस्थेचा पाझरता फायदा मूळ जनांनाही मिळाला. ते डोळे किलकिले करु लागले आणि असे होता होता त्यांच्या हे लक्षात आले की त्यांचे ‘राष्ट्र’ त्यांचे वर्चस्व कमी होत जाणार आणि म्हणून त्यांच्या विरुद्ध इथल्या मूळातल्याच बहाद्दरांना वापरले. मुस्लिमांविरुद्ध, इंग्रजांविरुद्ध. मुस्लिम, इंग्रजी राजवट व्यवस्था मानवीय होती आणि ती इथल्या दबलेल्या मूळजनांना जागे करत होती किंवा यांचे वर्चस्व कमी करत होती. म्हणून मूळ जनांतील लोकात बोलण्याची, विद्रोहाची ताकद येत होती ही ताकद यायच्या आधिच या षडयंत्रकारांनी त्यांना पराभूत केले. मुस्लिम गेले, इंग्रज गेले आणि पुन्हा सर्वस्वी अमानवी भट व्यवस्था मजबूत व्हायला लागली. सुधारलेल्या इंग्रजी राज्यात व व्यवस्थेत इथले मूळ जनातील क्रांतीकारी निर्माण झाले. इंग्रजांनी साथ दिली आणि यांच्या तळपायाची आग व मनातला राग मस्तकात गेला. त्याच काळात यांनी अनेक सोंगे घेतली. संपूर्ण ब्राम्हणी राष्ट्राचा विरोध करणारे महापुरुष वाढू नये, आम लोकात तो राग संचारु नये म्हणून कुणी हिंदुत्वाचा, कुणी समाजवादाचा, कुणी साम्यवादाचा रंग फासला. या प्रभावी सोंगाड्यांपुढे मूळ जनातले क्रांतीकारी दाबण्यात आले. स्वातंत्र्याच्या नावाखाली इंग्रजांच्या विरुद्धची लढाई ही इथल्या मूळ जनांच्या वाढत्या जागृती विरुद्धची लढाई होती. १८५७ चे बंड सावरकर, टिळक यांना म्हणून स्वातंत्र्य समर वाटत होते तर फुल्यांना केवळ भटपांड्यांचे बंड वाटत होते. या घटनेचे दोन अर्थ स्पष्टपणे विरोधाभासी होते. इंग्रजांनी बंड दाबले पण सुधारणाही थांबवल्या. पेशवीवृत्तीचा आंशिक विजय झाला. तेव्हा पासून भटांचे स्वातंत्र्य समर वाढत गेले. त्यांचा क्लायमॅक्स १९४७ साली त्यांच्या विजयाने झाला. *शोषणातून मुक्ती व राष्ट्रनीती इंग्रजी अंमल हा प्रत्यक्षपणे बहुजनांचे शोषण करणारा नव्हता. उलट इंग्रजांनी इथल्या बहुजनांसाठी नवीन वाटा मोकळ्या केल्या होत्या. याच काळात जोतीराव फुले, शाहू राजे, पेरियर रामस्वामी, डॉ. आंबेडकर यांचे क्रांतीकार्य बहरले. या सर्वांनी इंग्रजी राज्यातही ब्राम्हणी वर्चस्वाविरुद्ध लढा दिला. त्यामुळे इथल्या बहुजनांना खरे काय ते कळायला लागले. दृष्टी व्यापक होत गेली. मानवी हक्क कळायला लागले. स्वातंत्र्यानंतर मात्र इंग्रजांचा वचक, दबदबा कमी झाला आणि आधीच दबा धरुन बसलेले ब्राम्हणी वर्चस्व पुन्हा उफाळून आले. बहुजनांना एकदम निराधार वाटू नये, निराश्रित वाटू नये म्हणून ब्राम्हणी पकड सुरुवातीला नेहरु सारख्या भ्रामक उदारवादी, पुरोगामी नेत्यांकडे ठेवण्यात आली. नेहरुंनी एक चेहरा उदारवादी ठेवला असला तरी ब्राम्हणी वर्चस्वाच्या वाटचालीला बाधा येईल अशी कुठलीही पावले उचलली नाही. हिंदुमहासभा, रा.स्व. संघ. यांच्या कुरापती, कारवाया वाढत राहिल्या. बहुजनांतील नेत्यांना बदनाम करणे, त्यांनी बहुजन भल्याचे काम करु नये म्हणून त्यांना बहकवणे, फसवणे, विकत घेणे असे प्रकार सुरु झाले. इंग्रजांचा काळ गेल्या नंतर फुले-शाहू-आंबेडकरांसारखे प्रखर नेते मोठे होऊ न देण्याचे षडयंत्र आखण्यात आले. चंदापुरी, डॉ. पंजाबराव देशमुखांसारखे जे नेते होते त्यांना दाबण्यात आले. इंग्रजी काळातील बहुजन उत्थान थांबवण्यात आले. नारा समाजवादाचा आणि काम ब्राम्हणी वर्चस्ववाढीसाठी अशी नीती चालत राहली. स्वातंत्र्यानंतर बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियर रामस्वामी यांचे विचार व कार्य जेवढे १९४७ पूर्वी प्रभावकारी होते, सरकार, दरबारी जेवढी नोंद घेतल्या जात होती ती स्थिती राहली नाही. पेरियर रामस्वामींना तुरुंगात टाकण्याचे काम नेहरु सरकारनेच केले होते. आणि डॉ. आंबेडकरांना देखील तेवढा मान राहला नव्हता. त्यांचा घटना समितीत समावेश केल्यावर व त्यांनी मंत्री मंडळाचा त्याग केल्यावर त्यांच्यावर चिखलफेक करणे सुरु झाले होते. अर्थात, दलित, ओबीसींची चळवळ एकत्र कशी येणार नाही व त्यांना वेगळाले ठेवून त्याची शक्ती छिन्न कशी करता येईल याचे मनसुबे साकार करण्यात येत होते. हिंदुत्वाचा, संघाचा जोर वाढत होता. सारी प्रसार माध्यमे ब्राम्हणी होती व त्यामुळे धीरे धीरे वामनी पकड घट्ट होत गेली. इंग्रजी नीती वामनी नीतीत बदलत गेली. घसरत गेली. हिंदु राष्ट्राची भाषा व नीती ही तमाम ब्राम्हणी नेत्यांना माहित होती. मग ते काँग्रेस मधील, समाजवादी वा कम्युनिस्ट कुठल्याही प्रवाहातील असोत. त्यांची दिवसा भांडायचे व रात्री एकत्र बसायचे हा क्रम बहुजनांच्या लक्षात येत नव्हता. म्हणून दलित, ओबीसींना हे पुरोगामी खरे आहेत असे वाटत होते. त्यांना यांच्या मनातले हिंदुराष्ट्र कळणेही शक्य नव्हते. ती क्रिया सतत वाढत गेली. जात-वर्ण व्यवस्था विरोध कमी कसा होईल यावर साऱ्या वामनी गट व पक्षांचा डोळा होता. म्हणून त्यांनी स्वतःच आपले पुरोगामित्व जात बंदिस्त करुन टाकले. आपण सुरुवातीला मार्क्स लेनिन सांगणारे नेते पुढे टिळक, सावरकरवादी झाल्याचे पाहतो. या सर्वांना मूळ खाद्य पुरवणारी, केंद्रीय संस्था म्हणजे रा.स्व. संघ होय. वरवर विरोध व आतून सख्य असे विविध पक्षातील संघटनातील वामनी म्होरक्यांचे वागणे होते. आणि म्हणून आज आपण पाहतो सारे पुरोगामी समाजवादी खुजे - होत आहेत, झाले आहेत आणि आर.एस.एस. ने पेरलेली हिंदुराष्ट्रवादाचे - बी फोफावते आहे. त्याचे रुप आकाश व्यापत आहे. याचेच नाव हिंदुराष्ट्र - आहे. ब्राम्हणी वर्चस्व वाढत आहे. त्यांच्या साहित्यिक, धार्मिक, राजकीय - संघटना जोरशोरात सुरु आहेत. आणि यात बहुजनांचे स्थान गौण आहे. - म्हणून हिंदुराष्ट्र साकारत आहे म्हणायचे .●●




# निव्वळ 'अस्पृश्य' म्हणून प्रधानमंत्री होऊ न शकलेले जगजीवन राम

**जगजीवन राम अर्थात बाबूजी हे वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षांपासून राजकीय चळवळीत सक्रिय सहभागी राहिलेले नेते होते. शिक्षण घेत असतानाच ते १९३१ ला भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चे अधिकृत सभासद झाले. अस्पृश्य समाजाच्या प्रगतीसाठी मे १९३५ला ते व चंद्रिका राम हे कानपूर येथे 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लास लीग' या संघटनेची स्थापना करतात. जगजीवन राम हे या संघटनेचे संस्थापक सचिव होतात. त्यांचे कार्य व अभ्यास लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने त्यांची बिहार विधान परिषदेचे सदस्य म्हणून १९३६ मध्ये नियुक्ती करतात. १९३७ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बाबू जगजीवनराम यांनी त्यांच्या लीग तर्फे काही उमेदवार उभे केले. त्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाला बरेच यश मिळाले, ते स्वत: बिनविरोध निवडून आले. या वेळेस त्यांचे वय अवघे २९ वर्षे होते . १९४६ मध्ये ते संविधान सभेवर निवडून आले तसेच पंडित नेहरू यांच्या हंगामी मंत्रिमंडळात कामगार मंत्री झाले.**

जगात कमी वयाचे मंत्री म्हणून त्यांचा उल्लेख आहे. पुढे काँग्रेस मंत्रिमंडळात ते कृषी, संरक्षण, रेल्वे, दूरसंचार, दळणवळण सारख्या महत्त्वपूर्ण खात्याचे कॅबिनेट मंत्री राहिले. ते संरक्षण मंत्री असताना भारत - पाकिस्तान युद्ध झाले. भारताला युद्धात यश मिळाले, पाकिस्तानचे विभाजन होऊन स्वतंत्र बांगला देश निर्माण झाला. बांगला देशाच्या सरकारने जगजीवन राम यांचा या कार्यामुळे मोठा सत्कार केला होता. प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांचा त्यांच्यावर प्रचंड विश्वास होता. प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात १९७५ ला आणीबाणी लागू केली तेंव्हा या संबंधीचा ठराव लोकसभेत त्यांनी राम यांनाच मांडायला लावला होता. इंदिरा गांधी यांनी आणीबाणी लावल्यामुळे सर्व विरोधी पक्ष काँग्रेस विरुद्ध जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आले. काँग्रेस विरुद्ध इतर सर्व असे देशात चित्र होते. असे असले तरी १९७७ ला जेंव्हा लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या तेंव्हा काँग्रेस पुन्हा सत्तेवर येईल असे देशात चित्र होते. बहुतांश प्रमुख विरोधी नेते जेल मध्ये होते. निवडणुकीला फक्त ६० दिवसांचा अवधी होता. या दरम्यान जगजीवन राम हे काँग्रेस पक्षातून बाहेर पडतात, स्वतःचा वेगळा पक्ष काढतात व जनता पक्षासोबत युती करतात. जगजीवन राम यांनी २ फेब्रुवारी १९७७ ला काँग्रेस पक्ष सोडला आणि देशाचे राजकीय चित्र बदलून गेले. विरोधी पक्ष अधिक सक्रिय झाला. जयप्रकाश नारायण यांनी १९७७ मध्ये जर जनता पक्ष सत्तेवर आला तर जगजीवन राम हे प्रधानमंत्री होतील असे जाहीर केले. जनता पक्षातील सर्व घटक पक्षांनी त्यास संमती दिली. सर्व विरोधी पक्ष निवडणुकीला सामोरे गेले. जनता पक्षाचे एकूण २९८ खासदार निवडून आले. आता ठरल्या प्रमाणे जगजीवन राम यांना प्रधानमंत्री करणे आवश्यक होते, मात्र मोरारजी देसाई, चौधरी चरणसिंग हे सुद्धा या पदाच्या शर्यतीत उतरले. विविध प्रकारच्या राजकीय खेळ्या खेळत चरणसिंग यांनी राज नारायण यांच्या करवी मोरारजी देसाई यांना प्रधानमंत्री करावे असा संदेश जयप्रकाश नारायण यांना दिला व जयप्रकाश नारायण यांनी निवडणुकीत जनतेला दिलेल्या आश्वासनाला बाजूला ठेऊन मोरारजी देसाई यांना प्रधानमंत्री करण्याचे जाहीर केले. जगजीवन राम यांना उपप्रधानमंत्री केले गेले. केवळ अस्पृश्य असल्याने मार्च १९७७ ला प्रधानमंत्री होऊ न शकलेले जगजीवन राम १९६६ ला सुद्धा अस्पृश्य असल्याने प्रधानमंत्री होऊ शकले नाही. ११ जानेवारी १९६६ मध्ये प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांचे अकस्मात निधन झाले असता पुढील प्रधानमंत्री कोण? या संदर्भाने काँग्रेस संसदीय मंडळात निवडणूक घेण्यात आली तेंव्हा इंदिरा गांधी, जगजीवन राम, मोरारजी देसाई यांचेत निवडणूक झाली. जगजीवन राम निवडून येणार असे चित्र होते. कामराज, स. का. पाटील, अतुल्य घोष व काही मंडळी हे इंदिरा गांधी यांचे कट्टर विरोधक व मोरारजी देसाई यांचे विशेष सहकारी होते. मोरारजी देसाई यांच्या बाजूने खूपच कमी सभासद असल्याने ते निवडून येणार नव्हतेच पण, जगजीवन राम हे प्रधानमंत्री होउ नये म्हणून कामराज, पाटील, घोष ही मंडळी इंदिरा गांधी यांना मत देतात. त्यांच्या या खेळीमुळे जगजीवन राम १९६६ मध्ये प्रधानमंत्री होऊ शकले नाही. मार्च १९७७ मध्ये चरणसिंग यांच्या मुख्य खेळी मुळे जगजीवन राम ऐवजी मोरारजी देसाई प्रधानमंत्री झाले पण, ११ जुलै १९७७ ला यशवंतराव चव्हाण हे देसाई सरकार विरुद्ध लोकसभेत अविश्वासाचा ठराव आणतात तेंव्हा चरणसिंग त्यांच्या ६४ सभासदांना घेऊन जनता पक्षातून वेगळे होतात, त्यांना इंदिरा काँग्रेस बाहेरून पाठिंबा जाहीर करतात. या घटनेमुळे मोरारजी देसाई प्रधानमंत्री पदाचा १५ जुलै रोजी राजीनामा देतात. देसाई यांनी प्रधानमंत्री पदाचा राजीनामा जरी दिला असला तरी जनता पक्षाच्या नेतेपदी मीच असल्याने मला प्रधानमंत्री करावे असे एक वेगळे पत्र ते राष्ट्रपतींना देतात, या प्रसंगी जनता पक्षाचे अध्यक्ष असलेल्या चंद्रशेखर यांनाही आपण प्रधानमंत्री व्हावे असे वाटते देसाई - चंद्रशेखर यांच्या खेळीत जगजीवन राम यांना पुन्हा ते अस्पृश्य असल्याने प्रधानमंत्री पदाकरिता डावलले जाते. व दिनांक २८ जुलै १९७९ रोजी चरणसिंग प्रधानमंत्री होतात. चरणसिंग प्रधानमंत्री झाल्यानंतर देसाई नेतेपदाचा राजीनामा देतात. जगजीवन राम यांची नेतेपदी निवड होईल हे त्यांना माहीत असल्याने त्यांनी ही खेळी खेळली असावी पुढे चरणसिंग यांना बाहेरून दिलेला पाठिंबा इंदिरा गांधी यांची काँग्रेस काढून घेते, त्यामुळे चरणसिंग २८ ऑगस्ट १९७९ ला लोकसभा विसर्जित करून नव्याने निवडणुका घेण्याची शिफारस करून प्रधानमंत्री पदाचा राजीनामा देतात. ( इंदिरा गांधी यांनी पाठिंबा काढल्या नंतर चरणसिंग जगजीवन राम यांना पाठिंबा देऊ शकत होते, मात्र जगजीवन राम यांना ती संधी मिळूनये म्हणून ते लोकसभा विसर्जनाची खेळी खेळतात. या प्रसंगी पुन्हा जनता पक्ष जगजीवन राम यांना प्रधानमंत्री करण्या विषयी हालचाली करतात, राम हे जनता पक्षाचे नेते असतात. जनता पक्षाचे तेंव्हा २३४ सभासद असतात. द्रमुकचे १८ सभासद त्यांना पाठिंबा देतात. पाठींबा देण्याचे सत्र सुरूच असते. २२ ऑगस्ट १९७९ ला राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी जगजीवन राम व चंद्रशेखर यांना चर्चे करिता बोलावतात. हे दोघे नेते दुपारी राष्ट्रपती भवनातून बाहेर येतात तेंव्हा जगजीवन राम प्रधानमंत्री होणार हे जवळ जवळ निश्चित झाले होते . त्याच अनुषंगाने सारे काही घडत होते, मात्र संध्याकाळी राष्ट्रपती रेड्डी यांनी लोकसभा विसर्जित करून मध्यावधी निवडणुका जाहीर केल्या. रेड्डी यांच्या निर्णयाचे इंदिरा गांधीसह सर्वांनाच नवल वाटले. इथेही त्यांची जात आडवी आली आणि राम प्रधानमंत्री पदास मुकले. स्वतःला समाजवादी, साम्यवादी, पुरोगामी, इंदिरा गांधी यांचे कट्टर विरोधक म्हणविणारे, काँग्रेस हटावचे नारे देणारे अनेक तथाकथित नेते किती जातीयवादी व काँग्रेस भक्त होते हे या प्रकरणातून दिसून येते. जवळ जवळ ५० वर्षे भारतीय राजकारणात अग्रेसर राहिलेल्या जगजीवन राम यांचा आज स्मृतिदिन त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन.●●





**जयसिंग वाघ**
**मो.9881928881**

“ विश्वास ही मोठी ताकद आहे,
ती अशक्य गोष्टही शक्य करते ”



# नागरिक गुलाम नाहीत !

## मुंबई उच्च न्यायालयाचा लोकशाहीला दिलासा देणारा निर्णय

लोकशाहीची खरी ताकद सत्तेत नसते, तर ती नागरिकांच्या स्वातंत्र्यात असते. सरकार बदलतात, पक्ष बदलतात, विचारधारा बदलतात, पण संविधानाने नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार बदलत नाहीत.

म्हणूनच न्यायव्यवस्था ही केवळ कायद्याची नव्हे, तर लोकशाहीची अंतिम संरक्षक मानली जाते. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जे. जामदार यांनी दिलेल्या अलीकडील निर्णयाने हीच घटनात्मक भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. हा निर्णय केवळ एका व्यक्तीच्या हद्दपारीचा नाही तर नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, आंदोलनाच्या अधिकाराचा आणि संविधानाच्या सर्वोच्चत्वाचा पुनरुच्चार करणारा आहे. हे प्रकरण सय्यद अहमद अब्दुल वाहिद चौधरी यांच्या हद्दपारीशी संबंधित होते. सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया (SDPI) या नोंदणीकृत राजकीय पक्षाचे पदाधिकारी म्हणून त्यांनी केंद्र सरकारच्या काही निर्णयांविरोधात मोर्चे, आंदोलने आणि धरणे आयोजित केली होती. या आंदोलनांशी संबंधित प्रामुख्याने भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अंतर्गत गुन्हे दाखल झाल्यानंतर त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ५६ अंतर्गत हद्दपारीची कारवाई करण्यात आली. मात्र न्यायालयाने संपूर्ण नोंदी तपासल्यानंतर स्पष्ट शब्दांत नमूद केले की, सरकारच्या निर्णयांविरोधात आंदोलन करणे, घोषणाबाजी करणे किंवा निषेध व्यक्त करणे यामुळेच एखाद्या व्यक्तीच्या हालचाली समाजासाठी धोकादायक ठरतात, असा कोणताही पुरावा प्रशासनाकडे नव्हता. त्यामुळे अधिकाऱ्यांनी नोंदवलेले तथाकथित (सब्जेक्टिव सॅटिसफॅक्शन) कोणत्याही ठोस पुराव्याअभावी कायद्याच्या कसोटीवर टिकू शकत नाही. न्यायमूर्ती माधव जे. जामदार यांनी आपल्या लेखी निर्णयात स्पष्ट नमूद केले की, सरकारच्या काही निर्णयांना विरोध केल्यामुळेच एखाद्या नागरिकाला हद्दपार करणे हे संविधानाच्या कलम १९ अंतर्गत असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या आणि कलम २१ अंतर्गत सन्मानाने जगण्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे. ही नोंद केवळ एका याचिकाकर्त्याला दिलासा देणारी नाही तर भारतीय लोकशाहीच्या मूल्यांवर न्यायालयाने उमटवलेली ठाम मोहोर आहे. या निर्णयासाठी न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या अनुराधा भसीन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या ऐतिहासिक निर्णयाचा आधार घेतला. त्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की, लोकशाहीतील वैध मतप्रदर्शन, आंदोलन किंवा तक्रारी दडपण्यासाठी कायद्याचा वापर करता येत नाही. गुजरात उच्च न्यायालयाच्या तत्सम निर्णयाचाही संदर्भ देत मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, सरकारविरोधी




भूमिका घेणे हा गुन्हा नाही. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती जामदार यांनी केलेली काही तोंडी निरीक्षणेही देशभर चर्चेचा विषय ठरली. “सरकारच्या निर्णयांविरोधात नागरिकांनी आंदोलन करू नये का?”, “प्रत्येक आंदोलनावर गुन्हे दाखल करून नागरिकांना सरकारचे गुलाम बनवले जात आहे का?”, ‘भाजप सरकार मुर्दाबाद’ किंवा ‘अमित शाह मुर्दाबाद’ अशा घोषणा दिल्या म्हणून एखाद्याला हद्दपार कसे करता येईल?” असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. ही निरीक्षणे अंतिम लेखी आदेशाचा भाग नसली, तरी त्यातून व्यक्त झालेली घटनात्मक भूमिका लोकशाहीच्या आरोग्याबाबतची गंभीर चिंता व्यक्त करणारी आहे. लोकशाहीत सरकारवर टीका करणे म्हणजे राष्ट्रद्रोह नव्हे. सरकार म्हणजे राष्ट्र नाही आणि सत्ताधारी पक्ष म्हणजे संविधानही नाही. सत्ताधाऱ्यांवर प्रश्न विचारण्याचा अधिकार जिवंत असेल, तरच लोकशाही जिवंत राहते. अन्यथा विरोधी मत दडपण्याची प्रवृत्ती हळूहळू लोकशाहीचा गळा घोटू लागते. हद्दपारी हा कायद्यातील अत्यंत कठोर आणि अपवादात्मक उपाय आहे. एखादी व्यक्ती समाजासाठी प्रत्यक्ष धोका निर्माण करत असल्यासच त्याचा वापर व्हावा, अशी कायद्याची अपेक्षा आहे. परंतु केवळ आंदोलनाचे आयोजन केले, घोषणा दिल्या किंवा शासनाच्या धोरणांचा विरोध केला म्हणून हा उपाय वापरणे म्हणजे कायद्याच्या उद्देशालाच हरताळ फासणे होय. या निर्णयातून पोलीस प्रशासनालाही एक स्पष्ट संदेश मिळतो. कायद्याची अंमलबजावणी करताना राजकीय भूमिका नव्हे, तर घटनात्मक मूल्ये आणि वस्तुनिष्ठ पुरावे महत्त्वाचे असतात. नागरिकांचे अधिकार मर्यादित करण्यासाठी प्रत्येक कारवाई कायद्याच्या कठोर कसोटीवर टिकली पाहिजे. या निर्णयाकडे कोणत्याही एका पक्षाच्या विजय-पराभवाच्या चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. आज एका विचारसरणीच्या कार्यकर्त्याला न्याय मिळाला, उद्या दुसऱ्या विचारसरणीच्या व्यक्तीलाही हाच घटनात्मक आधार लागू होईल. कारण न्यायालये पक्षांच्या नव्हे, तर संविधानाच्या बाजूने उभी असतात. आजच्या काळात मतभेदांना संशयाने पाहण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. परंतु मतभिन्नता ही लोकशाहीची कमजोरी नसून तिची सर्वात मोठी ताकद आहे. प्रश्न विचारणारा नागरिक हा शत्रू नसतो तर तो लोकशाहीचा जागरूक प्रहरी असतो. मुंबई उच्च न्यायालयाचा हा निर्णय म्हणूनच एका व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही. तो प्रत्येक भारतीयाला आठवण करून देतो की, भारतामध्ये सत्ता संविधानापेक्षा मोठी नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततापूर्ण आंदोलन आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार हे कोणत्याही सरकारच्या कृपेवर अवलंबून नसून संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार आहेत. जेव्हा न्यायालये या अधिकारांच्या संरक्षणासाठी निर्भयपणे उभी राहतात, तेव्हा केवळ एका नागरिकाला न्याय मिळत नाही तर संपूर्ण लोकशाहीला नवजीवन मिळते. लोकशाहीचा श्वास पुन्हा मोकळा होतो आणि संविधानावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ होतो. अशा निर्णयांमुळेच न्यायालये ही लोकशाहीची अखेरची आशा असल्याची भावना अधिक बळकट होते.●●



प्रविण बागडे
9923620919

## व्याख्या सौख्याची

**अनंतायन**



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

कौन कहता है कि बड़ी गाड़ियों में ही सफर अच्छा होता है, सच्चे रिश्ते और अच्छे मित्र साथ हों तो जिंदगी पैदल भी मजेदार होती है.” माणसाच्या आयुष्यात सुखाची व्याख्या अनेकदा बाह्य गोष्टींनी केली जाते. मोठे घर, महागडी गाडी, भरपूर पैसा किंवा ऐश्वर्य म्हणजेच आनंद, असा एक गैरसमज समाजात रुजलेला दिसतो. पण वास्तवात आयुष्याचा खरा आनंद या गोष्टींमध्ये नसतो; तो असतो आपल्या माणसांमध्ये. कारण प्रवास किती आलिशान आहे, यापेक्षा तो कोणासोबत केला जातो, हे अधिक महत्त्वाचे असते सच्ची नाती ही आयुष्याची खरी संपत्ती असतात. सुखाच्या क्षणी टाळ्या वाजवणारे अनेक भेटतात; पण दुःखाच्या वाटेवर खांद्याला खांदा लावून चालणारे फार थोडे असतात. असे मित्र आणि आपुलकीची नाती असतील, तर काटेरी वाटही फुलांनी बहरल्यासारखी वाटते. जीवनातील प्रत्येक अडचण हलकी वाटते आणि प्रत्येक क्षण संस्मरणीय बनतो. मोठ्या गाड्यांमध्ये बसूनही अनेक जण एकाकी असतात, तर एखादा माणूस मित्रांसोबत पायी चालताना मनापासून हसत असतो. कारण आनंद हा साधनांमध्ये नसतो, तो सहवासात असतो. जिवाभावाची माणसे सोबत असतील, तर साधा चहाचा कपही मेजवानी वाटतो आणि छोटासा प्रवासही आयुष्यभर जपावी अशी आठवण बनून राहतो. म्हणूनच आयुष्यात संपत्तीपेक्षा माणसे कमवा. विश्वास जपा, मैत्री जपा, नाती जपा. कारण काळ बदलतो, परिस्थिती बदलते, वैभव कमी-जास्त होत राहते; पण मनापासून साथ देणारी माणसे मिळाली, तर जीवनातील प्रत्येक पाऊल आनंदाने भरून जाते खरा श्रीमंत तोच, ज्याच्याकडे प्रेमळ नाती आणि विश्वासू मित्रांची शिदोरी असते. अशी माणसं सोबत असतील, तर आयुष्याचा प्रत्येक प्रवास तो गाडीतला असो किंवा पायी नेहमीच सुंदर, अर्थपूर्ण आणि अविस्मरणीय ठरतो.●●

# संस्कार, शिक्षण आणि समाजसेवेचा प्रेरणादायी प्रवास इंजी. अविनाश कठाणे यांचे व्यक्तिमत्त्व आणि कार्य

**महाराष्ट्राच्या पूर्व टोकावर, मध्य प्रदेशाच्या सीमेलगत असलेल्या गोंदिया शहरात १९५६ साली एका बीडी व्यवसायिकाच्या कुटुंबात इंजी. अविनाश कठाणे यांचा जन्म झाला.**

साधी आर्थिक परिस्थिती, परंतु शिक्षणाविषयी प्रचंड आस्था आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा लाभलेल्या कुटुंबात त्यांचे बालपण घडले. रामनगर नगरपालिका शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी स्थानिक हायस्कूलमधून गुणवत्तायादीत द्वितीय क्रमांक मिळवत मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांचे वडील उच्चशिक्षित नसले, तरी मुलांनी शिक्षणाच्या बळावर स्वतःचे आणि समाजाचे भविष्य घडवावे, हा त्यांचा दृढ विश्वास होता. त्याच प्रेरणेतून अविनाश कठाणे यांनी गोंदियातील डी. बी. सायन्स कॉलेजमध्ये बी.एस्सी. (भाग-१) पूर्ण केल्यानंतर नागपूर येथे शासकीय विद्युत अभियांत्रिकी महाविद्यालयातून विद्युत अभियांत्रिकीची पदविका संपादन केली. त्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून सेवेत रुजू होऊन भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा, नांदेड आणि पुणे अशा विविध जिल्ह्यांमध्ये तब्बल ३४ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावत कार्यकारी अभियंता पदापर्यंत मजल मारली. शासकीय सेवेत अत्यंत जबाबदारीची पदे सांभाळतानाही त्यांनी शिक्षणाचा ध्यास कधीच सोडला नाही. बी.ई., एम.बी.ए., एम.आय.ई. आणि डी.सी.ओ. अशा विविध पदव्या संपादन केल्यानंतर सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी एम.ए. (आंबेडकर विचारधारा) ही पदवी प्राप्त केली. ज्ञानाची उपासना ही आयुष्यभराची साधना असते, याचा आदर्श त्यांनी आपल्या कृतीतून घालून दिला आहे. वडिलांकडून लाभलेले सामाजिक संस्कार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचारांची प्रेरणा यामुळे ते केवळ यशस्वी अभियंता म्हणूनच नव्हे, तर समाजाभिमुख कार्यकर्ते म्हणूनही ओळखले जातात. नागपूरच्या दीक्षाभूमी सौंदर्यीकरण आंदोलनापासून ते बोधगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनापर्यंत विविध सामाजिक आणि बौद्ध चळवळींमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. समाजसेवेची त्यांची भावना केवळ आंदोलनांपुरती मर्यादित नाही. पाचगावजवळील श्री. राम इंगोले संचलित विमलाश्रम अनाथालयाच्या विद्युतीकरणासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. अनाथ विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठीही त्यांनी वेळोवेळी मदतीचा हात पुढे केला. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन तत्कालीन हिमाचल प्रदेशच्या राज्यपाल सौ. प्रभा राव यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला, ही त्यांच्या सामाजिक बांधिलकीची साक्ष आहे. बुद्ध विहार समन्वय समितीच्या कार्यातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. समितीच्या माध्यमातून आयोजित कोकण अभ्यास दौऱ्याचे नियोजन, तसेच आळंदी येथे झालेल्या अधिवेशनाच्या निमित्ताने पुणे परिसरातील बौद्ध लेण्या आणि ऐतिहासिक स्थळांच्या अभ्यासभेटीचे त्यांनी केलेले नियोजन अनेक कार्यकर्त्यांसाठी ज्ञानवर्धक ठरले. अशा उपक्रमांमधून त्यांनी इतिहास, संस्कृती आणि बौद्ध वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण




कार्य केले आहे. इंजी. अविनाश कठाणे यांनी आपल्या पितामह स्वर्गीय शेठ चरणदासजी काशीराम कठाणे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या जीवनकार्यावर आधारित ग्रंथ प्रकाशित करून एक आदर्श उपक्रम हाती घेतला आहे. कुटुंब आणि समाजासाठी आयुष्यभर झटलेल्या व्यक्तिमत्त्वाचे कार्य पुढील पिढ्यांसमोर जतन करण्याचे हे कार्य अत्यंत स्तुत्य आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या पूर्वजांविषयीची कृतज्ञता व्यक्त केली आहे, तसेच कुटुंबातील सदस्यांना एकत्र आणून स्मृतींचा आणि संस्कारांचा अमूल्य ठेवा जपला आहे. आजच्या विभक्त कुटुंबपद्धतीच्या युगात पूर्वजांच्या कार्याचा गौरव करून कुटुंबातील ऐक्य वृद्धिंगत करण्याचा त्यांचा प्रयत्न समाजासाठीही अनुकरणीय आहे. अशा प्रकारचे चरित्रलेखन केवळ एका व्यक्तीचे जीवन मांडत नाही, तर एका पिढीचे संस्कार, मूल्ये आणि सामाजिक जाणीव पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करते. इंजी. अविनाश कठाणे यांचा जीवनप्रवास हा शिक्षण, कर्तव्यनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि वैचारिक निष्ठेचा सुंदर संगम आहे. ज्ञानाची अखंड साधना, समाजाविषयीची तळमळ आणि पूर्वजांविषयीची कृतज्ञता या गुणांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते. त्यांच्या कार्यातून प्रत्येकाने शिक्षण, संस्कार आणि समाजसेवा या त्रिसूत्रीचा स्वीकार करून स्वतःचे जीवन अधिक अर्थपूर्ण बनवावे, हीच या प्रसंगी सदिच्छा.●●

बबन चहांदे
मो.9371550439
ज्येष्ठ साहित्यिक व आंबेडकरी विचारवंत

# तिबेट चीन संबंध आणि डॉ. आंबेडकरांची परराष्ट्रविषयक भूमिका

**स्वातंत्र्यानंतर भारतासमोर अनेक परराष्ट्र विषयक आव्हाने उभी राहिली. भारताने आपले परराष्ट्रीय धोरण निश्चित केले. शेजारी असलेल्या राष्ट्रासह सर्व राष्ट्रासोबत मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे हा त्या धोरणाचा एक भाग होता.**

त्या मध्ये तिबेट आणि चीन प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा आणि दीर्घकालीन परिणाम करणारा विषय होता. तिबेट हा ऐतिहासिक दृष्ट्या भारत आणि चीन यामधील एक महत्त्वाचा भौगोलिक प्रदेश मानला जात होता. त्याचे बफर स्टेट म्हणून ब्रिटिशांनी स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवले होते. ब्रिटिश प्रशासक सर हॅनरी मॅकमोहन यांनी पाचशे पन्नास मैल अंतराची मॅकमोहन बॉर्डर लाईन आखून दिली पण चीनने तिला कधीच मान्यता दिली नाही. 1949 साली चीनमध्ये साम्यवाद्यांनी सत्ता काबीज केली. चीनने तिबेटवर 1950 साली सैन्य पाठवून तेथील नियंत्रण आपल्या हाती घेतले आणि हा प्रदेश चीनचा भाग असल्याचे घोषित केले. त्यावेळी तिबेटच्या राजकीय सत्तेची सर्व सूत्रे दलाई लामा यांच्या हातात आली. या दरम्यान तिबेटवर चिनी राजवटीचा अनियंत्रित अंमल सुरू झाला. दडपशाही, धाक, पिळवणूक यासारखे अत्याचार तिबेटच्या जनतेवर चिनी राजकर्त्यांकडून आणि लष्करांकडून होत होते. दलाई लामाकडे ना सेना होती ना युद्धाचा अनुभव होता. फक्त बुद्धाची करुणा आणि आत्मविश्वास होता . परिणामी चीनच्या वाढत्या अत्याचारामुळे दलाई लामा यांना तिबेट सोडून हजारो तिबेटियन सोबत 1959 मध्ये भारतात शरण आले. 1959 पासून आज पर्यंत निर्वासित राहून वयाच्या 90 व्या वर्षीही लोकशाही मूल्याच्या तत्त्वावर तिबेटियन स्वातंत्र्यासाठी लढत आहेत. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतात, कायमस्वरूपी असतात ते राष्ट्रीय हित. चीन हा बौद्ध धर्मीय देश असल्याने भारताचे चीनशी संबंध अधिक मजबूत करता येतील असा नेहरूचा




अंदाज होता. या आधारावर भारताने चीनशी 1954साली पंचशील करार केला व पंडित नेहरूंनी हिंदी चिनी भाई भाई चा नारा दिला आणि येथेच आपली फसगत झाली. तिबेटवर चीनचे सार्वभौमत्व मान्य केल्याने तिबेटचे बफर स्टेट संपुष्टात आले आणि चीनच्या सीमा भारताच्या सरहदीला येऊन भिडल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या संदर्भात भाकीत केले होते की चीनचे भारतावर कधीही आक्रमण होण्याची शक्यता आहे. ज्यांना आक्रमण करण्याची सवय आहे ते आक्रमण करतीलच. 26 ऑगस्ट 1954 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यसभेत परराष्ट्रीय धोरणावर भाषण केले. त्या भाषणात त्यांनी पंडित नेहरू च्या परराष्ट्रीय धोरणावर परखड टीका केली. त्या भाषणात डॉ आंबेडकरांनी भारत व चीन दरम्यान झालेल्या पंचशील करार किती भोंगळ आहे ते सांगण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकर म्हणतात जे पंचशील बौद्ध धर्माचे महत्त्वाचे अंग आहे त्या पंचशीलावर माओचा किंचित तरी विश्वास असता तर त्याने आपल्या देशात बौद्ध धर्मीयांना नक्कीच वेगळ्या रीतीने वागविले असते. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर असेही म्हणतात पहिली गोष्ट अशी की, राजकारणात पंचशीलाला स्थान नसते. कम्युनिस्ट देशाच्या राजकारणात तर मुळीच नसते. कम्युनिस्ट देशाची नीतिमत्ता ही नेहमीच बदलत असते. दुसरे असे की, आजची नीती उदयाला नाही. राजकारणी लोकांना नीतितत्त्वाबद्दल अप्रिती असते. विशेषता जे राजकारणी लोक परराष्ट्रीय व्यवहार सांभाळतात त्याच्यात ही गोष्ट प्रकर्षाने दिसून येते.

साम्यवाद आणि लोकशाही एकत्र कार्य करू शकतील काय? हा सिद्धांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विसंगत वाटत होता. चीन हा साम्यवादी देश आहे आणि भारत हा लोकशाहीवादी राष्ट्र आहे परिणाम स्वरूप दोन विभिन्न मतप्रणालीच्या देशाशी मैत्री होणे असंभव आहे. असे डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात साम्यवाद म्हणजे अरण्यातील वनवा आहे. जे जे त्याच्या मार्गात येतील त्याचा त्याचा विध्वंस करीत, स्वाहा करीत तो जातो. त्या वनव्यात सभोवताली असणाऱ्या देशांना मोठा धोका निर्माण झाला आहे. कुठल्याही देशाच्या परराष्ट्रीय धोरणात भौगोलिक घटक हा फार महत्त्वाचा आहे हे विसरता कामा नये. तिबेट हा भारतासाठी केवळ शेजारी प्रदेश नसून राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा संरक्षक प्रदेश आहे. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी अधोरेखित केले. राष्ट्रहित, सीमा सुरक्षा, सक्षम संरक्षण व्यवस्था आणि दूरदर्शी परराष्ट्र धोरण या बाबी भारताच्या प्रगती करिता गरजेच्या आहेत. परिणामी तिबेट व चीन प्रश्नाविषयी डॉ. आंबेडकरांनी मांडलेले विचार आजही मार्गदर्शक ठरतात. ●●

अशोक धमगाये
मो. 83790 12928

# हीच आमुची प्रार्थना, अन हेच अमुचे मागणे, मानवाने मानवाशी मानवासम वागणे...

याचा अर्थ आम्ही सर्वांनी एक मानव म्हणून अशी वंदना प्रार्थना करतो कि, आमच्या सर्वांची आमच्या स्वतःच्या मनाशीच हे मागणे, किंवा प्रेमळ सूचना असली पाहिजे की, आजपासून मी सर्व मानवाशी मग ते कोणत्याही जातीचे, धर्माचे, पंथाचे, राज्याचे, देशाचे, वेशभूषेचे, वेगवेगळी भाषा बोलणारे, श्रमिक, मजूर, कष्टकरी, वंचित, शोषित, पीडित व सर्व प्रकारच्या सर्व समाजातील व्यक्तीशी कुठलाही भेदभाव न करता माणुसकीने वागण्याचा संपूर्ण प्रयत्न करणार. अकुशल, अविचारी, दुराचारी वर्तन न करता एक माणूस म्हणून, एक भारतीय म्हणून माझी जबाबदारी माझे कर्तव्य समजून सर्व भारतीयांशी मायेने, प्रेमाने, बंधूतेने, आपुलकीने, जिव्हाळ्याने, मैत्रीने, सदाचाराणे वागण्याच्या सदैव प्रयत्न करेन. आज पासून स्वतःपासून सुरुवात करेन ही आमची प्रार्थना वंदना ही फक्त म्हणण्यासाठी किंवा फक्त ऐकण्यासाठी किंवा इतरांना सांगण्यासाठी नसून प्रत्यक्ष मानवी जीवनात व्यवहारात सदैव आचरणात आणण्याकरिता कटिबद्ध राहील. कुणालाही रंगावरून, जातीवरून, लिंगावरून, धर्मावरून विविध भेदावरून कधीही कमी लेखनार नाही. सर्व मानवाशी एकोप्याने राहून भेदाभेद निर्माण होणार नाही याकरिता संपूर्ण शक्ती, युक्ती, निशी प्रयत्न करीन. माणुसकीची झलक, माणुसकीची शिकवण स्वतः अंगिकार करून समाजात माणूसकी निर्माण होईपर्यंत सदैव कसोशीने प्रयत्न करीन. असा निश्चय प्रत्येक भारतीयाने करणे अत्यावश्यक आहे. नुसता निश्चय करून चालणार नाही तर प्रत्येक भारतीयाने आपल्या देशातील प्रत्येक मानव सुखी समृद्ध व आदर्श व्यक्तिमत्व निर्माण होईल याकरिता स्वतःपासून प्रयत्न करावेत. इतरांनाही सदाचाराची माणुसकीची शिकवण, महापुरुषांची शिकवण समजून सांगावी त्यामुळे आपल्या देशात प्रत्येक व्यक्तीमध्ये मैत्री, जिव्हाळा, प्रेम, आपुलकी, बंधुत्व, समता वाढण्यास मदत होऊ शकते. प्रबुद्ध भारत निर्माण होण्यास प्रत्येकाचा हातभार लागणे आवश्यक आहे असे वाटते.●●

**मंगलवाटा**



सम्राट माटे (मंगलदर्शी)
मो.9075113644

## वाचकांचे विचारपिठ

**बहुजन सौरभ**

### वारली या आदिवासीच्या कलेविषयी छान माहिती

प्रा संध्या राजुरकर यांनी वारली या आदिवासी जातीच्या कलेविषयी छान माहिती दिली आहे. नाशिक जिल्ह्यात सुरगाणा तालुक्यातील गावात वारली समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्या मुळे हे कला वैभव प्रत्यक्ष बघितले आहे. प्रा संध्या राजुरकर मॅडम यांनी वारली कलेवर लिहल्या मुळे आठवणीना उजाळा मिळाला. मॅडम अभिनंदन!

-अनिल वैद्य

वारली कलेच्या निमित्ताने रविवारच्या अंकात प्रकाशित संक्षिप्त स्वरूपात आढावा वाचला. छान लिहिला आहे. दुर्लक्षित होत चाललेल्या कलांना मूळ समाजच टाळतो आहे हे ही नजरेत भरते. तरीही जे कलावंत अश्या कलांना समर्पित आहेत त्यांना सलाम केलाच पाहिजे. या कलांना बाजारात सध्या विशेष स्थान नाही पण, समाजाच्या संस्कृतीक ऐश्वर्याच्या खुणा त्यात निश्चित आहेत. अभिनंदन. हार्दिक शुभेच्छा. अश्या आशयाचे लेखन प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणाऱ्यांनी अनुभवासह शेअर केले पाहिजे.( माझ्या कडे किमान एकतरी शर्ट, किंवा शॉर्ट बंगाली वारली पेंटिंगची असतेच. मी शोधतो,विकत घेतो, वापरतो.)

मॅडम,आजच्या अंकात माझे ' स्वप्नच!' शीर्षकाचे लेखन प्रकाशित केले त्याबद्दल आपला आभारी आहे. धन्यवाद!

-अनिरुद्ध कांबळे

# पळू सोनावळे लेणी (गणपती गडद)

**६-७ व्या शतकात पूर्वाभिमुख कोरलेली हि लेणी मु पो सोनावळे, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे असून मुंबई वरून जाताना कल्याण मार्गे मुरबाड - सोनावळे व जुन्नर मार्गे आळेफाटा-कल्याण रोड मार्गे माळशेज घाटातून येथे जाता येते.**

मुंबई हुन साधारण १०० किमी व जुन्नर पासून साधारण ११० किमी चा हा प्रवास असून गावात पोहोचल्यावर आपल्याला साधारण १ तासाचा ट्रेक करून लेणीवर जाता येते . प्राचीन काळात पुणे-कल्याण/कल्याण-मुरबाड-नाणेघाट या व्यापारी मार्गावरील व्यापाऱ्यांच्या विसाव्याचे हे एक ठिकाण होते. पूर्वी या भागात खडकात खोदलेल्या लेण्यांना स्थानिक लोक “गडद” म्हणत. यातील मुख्य लेणी दुमजली असुन त्याच्या व्दारपट्टीवर गणेश प्रतिमा कोरलेली असल्यामुळे या लेण्यांना गणपती गडद असे म्हणतात. तसेच हि लेणी २ गावाच्या (पळू -सोनवले )हद्दीत असल्याने पळू सोनावळेः लेणी देखील म्हणतात. प्राचीन काळी कल्याण - मुरबाड - वैशाखरे - नाणेघाट असा व्यापारी मार्ग होता. छोट्या गलबतातून कल्याण बंदरात उतरणारा माल या व्यापारी मार्गाने घाटावरील बाजारपेठात जात असे. या व्यापारी मार्गावर माळशेजच्या डोंगररांगेत पळु सोनावळे गावाजवळील डोंगरात हा १२ लेण्यांचा समूह आहे. कल्याण ते मुरबाड हे अंतर साधारण २७ किलोमीटर आहे. स्वतःचे वाहन असल्यास उत्तम, नसल्यास कल्याण ते मुरबाड अशी एसटी सेवा उपलब्ध आहे. तिथून खाजगी वाहनांनी सोनावळे गावाला जाता येते. माळशेज घाटमार्गे सरळगाव, उमरोली, धसई आणि सोनावळे असा प्रवास करावा लागतो. यासह मुरबाडहून म्हसा जंक्शन आणि तिथून धसई हा मार्गही आहे. पायथ्याच्या सोनावळे गावापासून या लेणीवर जाण्यासाठी ३.५ किमी चे अंतर असून जिथे वनविभागाचा प्रवेशद्वार आहे तेथून आपल्याला लेणीवर जाण्यासाठी पायवाट आहे. ट्रेकर्स व लेणी संवर्धक मित्रांनी या पायवाटेवर मार्ग दाखविण्यासाठी रिबिन्स बांधलेल्या आहेत . त्यामुळे आपल्याला न चुकता लेणीवर जाता येते. जैवविविधतेने नटलेल्या ह्या जंगलात विविध प्रकारची फुले, फुलपाखरे, मोहा ची झाडे (ज्यापासून औषधी गुणधर्म असलेली दारू बनवतात) तर आहेतच पण वाघ, बिबट्या सारखी हिंस्त्र श्वापदे देखील आहेत. त्यामुळे जाताना सावधगिरी नक्कीच बाळगावी. लेणीवर चढाई करताना आपल्याला आजूबाजूला घनदाट जंगल, लहान-मोठे आकार असलेली झाडे आणि पाने, रंगीबेरंगी रानफुले, खळाळणारे झरे, असंख्य धबधबे आपला थकवा दूर करतात . या मार्गावर चढण्या-उतरण्यासाठी अवघड असलेल्या ३-४ पॅचेसमुळे ट्रेकमध्ये थोडा रोमांच अनुभवता येतो. पावसामुळे दगडावर साचलेल्या शेवाळामुळे, निसरड्या चिखलामुळे, दोन दगडातील उंच अंतराने आणि अरुंद पायवाटे मुळे हा ट्रेक थोडा आवाहनात्मक वाटतो. लेण्यांकडे जाणारी पायवाट खूपचं अरुंद असून एका बाजूला दरी असल्याने तिथून काळजीपूर्वक जावे लागते. साधारण १८०-२०० मी. लांबीच्या दगडात या लेण्या कोरलेल्या आहेत. एका बाजूला लेण्या, दुसऱ्या बाजूला धसाई धरणाचे पाणी व पावसाळ्यात लेण्यांवरून कोसळणारा प्रचंड मोठा धबधबा आणि पाण्याच्या धबधब्याच्या आवाजा व्यतिरिक्त असणारी असीम शांतता येथे अनुभवायला मिळते. ७/८ व्या शतकातील हिंदू लेणी दोन मजली असून खालच्या मजल्यावर विसाव्याच्या खोल्या तर वरच्या मजल्यावर गणेश मंदिर आहे. गणेश मंदिर बंद करण्यासाठी दरवाज्याची व्यवस्था ही आहे. गणेश मंदिरात प्रवेश करण्यासाठी दगडात कोरलेल्या ६-७ पायऱ्या (खोबण्या) आहेत. मंदिरात प्रवेश करताच समोर प्रचंड मोठे ध्यानधारणा/प्रार्थनास्थळ/ सभामंडप असून आणि समोर शेंदूर लेपित गणेशमूर्तीचे दर्शन घडते. ह्या उजव्या सोंडेच्या गणेशमूर्ती आहेत. उजव्या सोंडेच्या मूर्ती खूप शक्तिशाली व जागृत असतात आणि त्यामुळेचं या स्थळाचे धार्मिक महत्व अनन्यसाधारण आहे. या मूर्तीच्या मागेच एक भुयारी मार्ग आहे (सध्या तो बंद आहे) जो शिवनेरी गडावर निघतो असे स्थानिक सांगतात . शेजारी राम-लक्ष्मण, सीता आणि हनुमानाची मूर्ती आहे. गणेशाचे हे मंदिर चार स्तंभावर उभे आहे. स्तंभावर छताचा भार तोलणारे यक्ष कोरलेले आहेत. याशिवाय किर्तीमुख, सुरसुंदरी , काही अस्पष्ट मुर्त्या , नक्षी, स्तंभावर कोरलेल्या आहेत .स्तंभावर रंगकाम केल्याने या शिल्पांची स्पष्ट ओळख होत नाही. गाभाऱ्याच्या दोन बाजुला दोन खोल्या (कक्ष) असुन त्या रिकाम्या आहेत. लेण्यांच्या परीसरात पाण्याच्या ३ टाक्या आहेत. त्यातील एका टाक्याच्या वरच्या बाजुस कातळात खाचा बनवलेल्या आहेत. टाक्यातील पाण्याचे बाष्पीभवन होउ नये म्हणुन या खाचांमधे लाकडी पट्ट्या आडव्या टाकुन त्यावर आच्छादन केले जात असे. या लेणीच्या जवळपास , नाणेघाट, जीवधन, दुर्ग-ढाकोबा, सिद्धगड, गोरखगड किल्ला पाहायला मिळतो . काही वर्षांपासून या लेण्यावरील धबधब्यावर रॅप्लिंग होतं असून, लेण्यांना भेट देणाऱ्यांची संख्या वाढत आहे. पावसाळ्याच्या या दिवसांत लेण्यांच्या माथ्यावरून कोसळणाऱ्या धबधब्यांमुळे पाण्याची एक चादरच गडदेसमोर पाहायला मिळते. जानेवारी २०१८ ला या लेणी परिसरात अश्वमेध प्रतिष्ठान, गणेश गडद ट्रस्ट आणि वन विभाग यांनी संयुक्तपणे राबविण्यात आलेल्या एका मोहिमेत लेण्यांकडे जाणारी प्राचीन वाट सापडली होती. या वाटेल कठडा असल्याने लेण्यांकडे जाण्याचा मार्ग सोपा सुरक्षित होणार आहे . वन विभागाने डोंगरातील एका बारमाही झऱ्यावर नळपाणी योजना राबवून ते पाणी थेट लेण्यांमीधील टाकीत आणले. तसेच सौरदिवे देखील लावले होते. काही वर्षांपूर्वी येथे गणेश गडद ट्रस्ट स्थापन झाले असून या ट्रेक मार्गावर काही सुधारणा त्यांच्याकडून करण्यात येत आहेत, जसे, रस्ता बांधणी, प्रशिक्षित गाईड नेमणूक, आपत्कालीन व्यवस्थेत सोय, पर्यटकांची नोंद, दर महिन्याच्या चतुर्थीला गणेशापूढे दिवाबत्ती आणि लेण्याची स्वच्छता, ट्रेकर्स, पर्यटक, भाविकांची राहणे-खाण्याची व्यवस्था, वाहनाची व्यवस्था, मोठ्या झऱ्यांच्या पाण्याच्या प्रवाहात दगड टाकून आणि त्याला लोखंडी तारेने आवळून ताब्यात आणला आहे जेणे करून झरे पार करणे सोपे जावे आणि दुर्घटना टाळता येतील . ट्रेक मार्गावर ट्रेकर्सच्या विसाव्यासाठी गार्डन बांधण्याचा ट्रस्टचा विचार आहे. रस्त्यालगत वृक्षारोपणाचेही काम सुरु आहे, वरच्या पठारावर पाण्याची टाकी बांधून झऱ्याचे पाणी पाईप लाईनने टाकीत साठवले जाणार आहे जेणे करून “गणेश दर्शनाला” येणाऱ्या लोकांना पाणी सहज उपलब्ध होईल. ट्रेकर्स, भाविकांसाठी सुरस अन्नाची व्यवस्थादेखील हे ट्रस्ट करत आहे! लेण्यांचे आणि जैवविविधतेने नटलेल्या जंगलाचे जतन करण्यासाठी हे ट्रस्ट सतत कार्यरत आहे! गणेशोत्सवात काळात या लेण्यांवर पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते . ढाकोबा, दुर्ग या रांगेतले हे ठिकाण कुणालाही भेट देता येण्यासारखे आहे. डोंगराच्या कुशीत वसलेल्या आणि खडकात खोदलेल्या लेण्यासहित या शांततामय रम्य ठिकाणाला एकदा तरी अवश्य भेट द्या! येथे तुम्ही कोणत्याही ऋतूत मध्ये गेलात तरी मन प्रसन्न राहील एवढे मात्र नक्की. गणपती गडद या ठिकाणच्या भेटीसह तुम्ही नाणेघाट, माळशेज घाट, भैरवगड (मोरोशी). मच्छींद्रगड - गोरखगड, सिद्धगड (उचले गाव) किंवा अहुपे घाटपायथा (खोपिवली गाव) यांपैकी कोणत्याही जोडट्रेकचे नियोजन करू शकता. ●●






प्रफुल्ल पुरळकर
मो. 9930214308

सोमवार ०६ जुलै २०२६

Monday 06 July 2026

बहुजन सौरभ

BAHUJAN SAURABHA



## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १९५

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आर्वी. जि. वर्धा



भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आंबेडकर वार्ड आर्वी तालुक्यातील सिद्धार्थ बौद्ध विहार परिसरातील आहे. गावातील मुख्य चौकात असून येथिल लोक येथे एकत्र येतात. दिनविशेष कार्यक्रम आयोजित करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशानुसार येथिल लोक शिक्षण घेऊन संघटित आहेत. येसगाव हे चळवळीचे ठिकाण आहे.

संवाद मित्र, राजू थुल
मो. 9423420031

# महावितरण सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणाचा प्रश्न ऐरणीवर

## मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेची डॉ. नितीन राऊत यांच्याशी चर्चा



**नागपूर :** महावितरणमधील हजारो सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी राज्याचे माजी ऊर्जामंत्री व ज्येष्ठ आमदार डॉ. नितीन राऊत यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. संघटनेच्या शिष्टमंडळाने पावसाळी अधिवेशनात सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडल्याबद्दल डॉ. राऊत यांचे आभार मानले. यावेळी नियमितीकरण, कंत्राटी नियुक्तीतील जाचक अटी, कर्मचाऱ्यांचे शोषण तसेच सेवा अटींशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. संघटनेने मांडलेल्या समस्यांची गांभीर्याने दखल घेत शासनस्तरावर हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन डॉ. राऊत यांनी दिले. पावसाळी अधिवेशनात औचित्याचा मुद्दा उपस्थित करत डॉ. राऊत यांनी अनुभवी उपकेंद्र सहाय्यकांना पुन्हा कंत्राटी पद्धतीत अडकवणे हा त्यांच्या कौशल्याचा अपमान असल्याचे सांगत सरकारवर टीका केली होती. उपकेंद्र सहाय्यकांना तात्काळ नियमित करण्यात यावे, तसेच कनिष्ठ सहाय्यक (लेखा), विद्युत सहाय्यक आणि कार्यालयीन सहाय्यक यांच्या कंत्राटी सेवाकालाची मुदत तीन वर्षांवरून एक वर्ष करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली होती. याशिवाय, सहाय्यक कर्मचाऱ्यांचा कंत्राटी सेवाकाल मूळ सेवेत ग्राह्य धरून त्यांना वेतनवाढ, पदोन्नती व अन्य सेवा लाभ देण्यात यावेत, अशीही आग्रही मागणी त्यांनी विधिमंडळात मांडली होती. दरम्यान, सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणाचा प्रश्न निकाली निघेपर्यंत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेने व्यक्त केला आहे.

# व्हीएनआयटीमध्ये मागासवर्गीयांची ८० प्राध्यापक पदे रिक्त

## विशेष भरती मोहीम राबविण्याची 'आसरा' संघटनेची मागणी

**नागपूर :** विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (व्हीएनआयटी) येथे अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातील प्राध्यापकांची तब्बल ८० पदे रिक्त असल्याची माहिती माहिती अधिकार (आरटीआय) अंतर्गत समोर आली आहे. आरक्षणाच्या नियमांनुसार मंजूर असलेल्या १६० पदांपैकी निम्मी पदे रिक्त असल्याने केंद्रीय शैक्षणिक संस्था (शिक्षकांचे संवर्ग आरक्षण) कायदा, २०१९ च्या तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचा आरोप आसरा (ASRA) संघटनेचे संजय थुल यांनी केला आहे. व्हीएनआयटीच्या आस्थापना विभागाने माहिती अधिकारांतर्गत उपलब्ध करून दिलेल्या आकडेवारीनुसार, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी मंजूर ४८ पदांपैकी केवळ २८ प्राध्यापक कार्यरत असून २० पदे रिक्त आहेत. अनुसूचित जमाती प्रवर्गात २३ मंजूर पदांपैकी फक्त ९ प्राध्यापक कार्यरत असून १४ पदे रिक्त आहेत. तर इतर मागासवर्गीयांसाठी मंजूर ८९ पदांपैकी केवळ ४३ प्राध्यापक सेवेत असून तब्बल ४६ पदे रिक्त आहेत. अशा प्रकारे आरक्षित प्रवर्गातील एकूण १६० मंजूर पदांपैकी ८० पदे रिक्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. संस्थेने ४ जुलै २०२५




रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत केवळ ९ बॅकलॉग पदांच्या भरतीची प्रक्रिया जाहीर करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात ८० पदे रिक्त असताना एवढ्याच मर्यादित पदांसाठी भरती प्रक्रिया राबविणे अपुरे असून, त्यामुळे मागासवर्गीय उमेदवारांच्या घटनात्मक प्रतिनिधित्वावर परिणाम होत असल्याचा आरोप 'आसरा' संघटनेने केला आहे. या पार्श्वभूमीवर संजय थुल यांनी व्हीएनआयटी प्रशासनाला निवेदन सादर करून सर्व रिक्त आरक्षित पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहीम तातडीने हाती घेण्याची, तसेच पारदर्शक आणि कालबद्ध भरती प्रक्रिया राबविण्याची मागणी केली आहे. दरम्यान, आरक्षणाच्या अनुशेषाबाबत आणि विशेष भरती मोहिमेच्या मागणीवर व्हीएनआयटी प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## महत्वाचे

### गजाननराव महल्ले यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस साजरा



**नागपूर :** पतंजलि योग समिती आणि ज्येष्ठ नागरिक मंडळातर्फे गजाननराव महल्ले यांच्या अमृतमहोत्सवी (७५ व्या) वाढदिवसानिमित्त जवाहर सभागृहात सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नामदेव फटिंग होते, तर प्रमुख अतिथी म्हणून पांडुरंग वाकडे पाटील उपस्थित होते. शाल व पुष्पगुच्छ देऊन गजाननराव महल्ले यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात हरिश देशमुख यांनी महल्ले यांच्या स्वातंत्र्यसैनिकांचा वारसा, यशस्वी व्यापारी, दानशूर व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला. प्रमुख अतिथी पांडुरंग वाकडे पाटील यांनी त्यांना अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे धनी असल्याचे सांगितले. मनोगत व्यक्त करताना गजाननराव महल्ले यांनी भावूक होत उत्कर्ष आम्रपाली विमला आश्रमाला ५,००० देणगी जाहीर केली. महादेवराव बोराडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला नामदेव फटिंग, भीमराव पाटील, श्रीराम दुरुगकर, गुलाबराव उमाठे, भास्कर चौधरी, अविनाश महल्ले, पद्माकर आगरकर, भास्कर रघुरते तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### मुंबईसह कोकण-मध्य महाराष्ट्राला अतिमुसळधार पावसाची शक्यता



**मुंबई :** राज्यात मागील काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. हवामान विभागाने पावसाबाबत अपडेट दिली आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) ५ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिकृत प्रसिद्धी पत्रकानुसार बंगालच्या उपसागरीय क्षेत्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचे आता तीव्र 'अवदाब'मध्ये रूपांतर झाले आहे. या हवामान प्रणालीमुळे संपूर्ण महाराष्ट्रात मान्सून सक्रिय झाला असून राज्यामध्ये पुढील काही दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गेल्या २४ तासांत राज्याच्या विविध भागांत अतिवृष्टीसदृश म्हणजेच २१ सेमी पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. मुंबई आणि उपनगरांमध्ये पावसाचा जोर प्रचंड होता. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या किनारपट्टीच्या जिल्ह्यांमध्ये बहुतांश ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार, तर काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस कोसळण्याची दाट शक्यता आहे.

### नाशिक महाकुंभ स्वच्छतेसाठी इनरव्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटीचा खारीचा वाटा

**नागपूर :** आगामी नाशिक महाकुंभ यात्रेच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता अभियानाला हातभार लावत इनरव्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटी (डिस्ट्रिक्ट ३०३) यांच्या वतीने दोन मोठ्या कचरा पेट्या (डस्टबिन) प्रदान करण्यात आल्या. 'आरोग्याचा मार्ग स्वच्छतेकडूनच जातो' हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. महाकुंभसारख्या भव्य धार्मिक सोहळ्यात स्वच्छता राखणे ही सामूहिक जबाबदारी असून, त्यासाठी इनरव्हील क्लबने आपल्या सामाजिक बांधिलकीतून हा खारीचा वाटा उचलला आहे. हा उपक्रम डिस्ट्रिक्ट ३०३ च्या विशेष प्रकल्पांतर्गत राबविण्यात आला. यावेळी डिस्ट्रिक्ट चेअरमन मनीषा चौधरी, क्लब अध्यक्षा स्मिता बागडदेव, डिस्ट्रिक्ट आयएसओ स्वाती वानकर, पूर्वाध्यक्षा शारदा रोशनखेडे, आयएसओ वैशाली चिंचोळकर, खजिनदार सुप्रिया पाठक, क्लब एडिटर सीमा मेटांगळे यांच्यासह क्लबच्या सर्व माजी अध्यक्षा व एकूण १८ सदस्य उपस्थित होते.

# दक्षिण नागपूरातील स्कूल व्हॅनच्या नियमभंगावर कारवाईची मागणी

## वाहतूक पोलिसांना निवेदन

**नागपूर :** दक्षिण नागपूर शिवसेने च्यावतीने अजनी वाहतूक नियंत्रण शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश वासेकर यांना स्कूल व्हॅनच्या सुरक्षिततेसंदर्भात विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. विधानसभा संघटक विशाल कोरके व धम्मा सोनटक्के यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, दक्षिण नागपूरातील रिंग रोड पलीकडील हुडकेश्वर, नरसाळा, पिपळा, बेसा, आदी भागांमध्ये शाळांची संख्या मोठी असून विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात पिवळ्या रंगाच्या स्कूल व्हॅन तसेच खासगी वाहने वापरली जात आहेत. या परिसरात अनेक ठिकाणी वाहतूक सिग्नल नसल्याने आणि वाहतूक पोलिसांचे पुरेसे लक्ष नसल्याने वाहनचालकांकडून वाहतूक नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे या भागात स्कूल वाहनांचे अपघातही वारंवार घडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शिवसेनेने मांडलेल्या प्रमुख मुद्द्यांमध्ये काही स्कूल व्हॅन चालक अल्पवयीन असल्याचा संशय, स्कूल व्हॅनच्या नावाखाली खासगी क्रमांकाच्या वाहनांचा वापर, वाहनांवर चालक व मालकाचे मोबाईल क्रमांक नसणे, चालक व मालकांचे पोलीस पडताळणी (व्हेरिफिकेशन) न झाल्याचे प्रकार, काही चालक मद्यप्राशन करून वाहन चालवत असल्याच्या तक्रारी तसेच वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र, विमा व इतर आवश्यक कागदपत्रांची नियमित तपासणी होत नसल्याचा समावेश आहे. या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेऊन स्कूल व्हॅन चालक, मालक आणि पालक यांच्यासाठी जनजागृती व मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करावी तसेच नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालक व मालकांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी दक्षिण नागपूर शिवसेनेच्या वतीने करण्यात आली. यावेळी नीलिमा शास्त्री, राकेश भोंदले, निरंजन नाकाडे, अतुल डहाके, रुपेश ठाकरे, आझाद ठाकूर, अखिलेश भुगावकर यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.






# उच्च शिक्षित तरुणीचा आयटीआयकडे कल

**नागपूर :** संताजी जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रियेला आज उत्साहात प्रारंभ झाला. प्रवेशाच्या पहिल्याच दिवशी इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी पदवीधारक श्लेषा वंजारी हिने बिल्डिंग कन्स्ट्रक्शन मेसन या व्यवसायात प्रवेश घेतल्याने संस्थेत तिचे विशेष कौतुक करण्यात आले. उच्च शिक्षण पूर्ण करूनही कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व ओळखत श्लेषा वंजारी हिने आयटीआयमध्ये प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला. बदलत्या रोजगाराच्या संधी लक्षात घेता कौशल्य विकासाला प्राधान्य देणाऱ्या तरुणाईसाठी तिचा निर्णय प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. बिल्डिंग कन्स्ट्रक्शन मेसन या व्यवसायात सर्वप्रथम प्रवेश घेतल्याबद्दल संस्थेच्या उपसंचालक श्वेता कुलकर्णी यांच्या हस्ते श्लेषा वंजारी यांचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गटनिर्देशक जयंत टाळटुले, अविनाश केने, सिद्धार्थ मेहरे, बांदरे, फाळके, व्यवसाय निदेशक इंद्रभूषण बेलसरे, प्रभाकर मुंडे तसेच संस्थेतील इतर निदेशक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उच्च शिक्षित तरुण - तरुणी आयटीआयच्या कौशल्याधारित अभ्यासक्रमांकडे आकर्षित होत असून रोजगाराभिमुख शिक्षणाला प्राधान्य देत असल्याचे आशादायक चित्र यानिमित्ताने दिसून आले. बिल्डिंग कन्स्ट्रक्शन मेसन व्यवसायात प्रथम प्रवेश घेतल्याबद्दल कु. श्लेषा वंजारी हिचा उपसंचालक सौ. श्वेता कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी गटनिर्देशक जयंत टाळटुले, सिद्धार्थ मेहरे, बांदरे, फाळके, व्यवसाय निदेशक इंद्रभूषण बेलसरे, प्रभाकर मुंडे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# आरटीएमएनयूच्या निकाल विलंबामुळे एलएलबी प्रवेश संकटात

## 'रिझल्ट अवेटेड' तरतुदीची विद्यार्थ्यांची मागणी

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ (आरटीएमएनयू) अंतर्गत अंतिम वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमांचे निकाल वेळेत जाहीर न झाल्यामुळे एमएच सीईटी लॉ (३-वर्षीय एलएलबी) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शेकडो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची (कॅप) अंतिम मुदत जवळ येऊन ठेपली असतानाही विद्यार्थ्यांना अंतिम वर्षाचे गुणपत्रक उपलब्ध नसल्याने ऑनलाइन नोंदणी पूर्ण करता येत नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) सेलने त्रिवर्षीय एलएलबी प्रवेशासाठी कॅप प्रक्रिया सुरू केली असून, उमेदवारांना अंतिम वर्षाचे गुणपत्रक, एकूण गुण व टक्केवारी अपलोड करणे अनिवार्य आहे. मात्र आरटीएमएनयूकडून बी.ए., बी.कॉम., बी.एससी.सह विविध पदवी अभ्यासक्रमांचे निकाल अद्याप पूर्णपणे जाहीर न झाल्याने पात्र विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेत सहभागी होऊ शकत नाहीत. या परिस्थितीचा सर्वाधिक फटका नोकरी करणारे, प्रौढ, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर




सीईटी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बसत आहे. अनेकांनी कोचिंग, परीक्षा शुल्क आणि प्रवेश प्रक्रियेसाठी मोठा आर्थिक खर्च केला असून, केवळ निकालाच्या विलंबामुळे त्यांचे संपूर्ण शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर 'द प्लॅटफॉर्म' या सामाजिक संघटनेने विद्यार्थ्यांच्या वतीने आरटीएमएनयूचे कुलगुरू, राज्य सीईटी सेल, उच्च शिक्षण संचालनालय (डीएचई) तसेच राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे निवेदने सादर केली आहेत. विद्यापीठाने तातडीने निकाल प्रक्रिया पूर्ण करावी तसेच सीईटी सेलने 'रिझल्ट अवेटेड' (निकाल प्रलंबित) या विशेष तरतुदीअंतर्गत विद्यार्थ्यांना कॅप प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शैक्षणिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, विद्यापीठाच्या परीक्षा वेळापत्रक आणि राज्याच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये आवश्यक समन्वयाचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहे. नियोजनातील त्रुटी आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले आहे. द प्लॅटफॉर्मचे सदस्य राजीव खोब्रागडे म्हणाले, ₹संस्थात्मक गैरव्यवस्थापन, ढिसाळ प्रशासन आणि नियोजनाच्या अभावामुळे विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण अडवले जाऊ नये. एमएच सीईटी लॉ परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी विद्यापीठाच्या निकाल विलंबामुळे प्रवेशापासून वंचित राहण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे कॅप प्रक्रियेची मुदत वाढविण्यासह 'रिझल्ट अवेटेड' ही विशेष तरतूद तातडीने लागू करावी, जेणेकरून विद्यार्थ्यांचे एक मौल्यवान शैक्षणिक वर्ष वाचू शकेल.

# संविधानाची मूल्ये समाजापर्यंत पोहोचविण्याची गरज : ई. झेड. खोब्रागडे




**संवाद मित्र जयंत साठे, नागपूर :** भारतीय संविधानातील मूल्ये आणि विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृतीची आवश्यकता असून, शाळांपासून संविधान वाचनाची चळवळ अधिक बळकट झाली पाहिजे, असे प्रतिपादन प्रमुख अतिथी ई. झेड. खोब्रागडे यांनी केले. बहुजन हिताय संघाच्या ४७७ व्या साप्ताहिक सभेचे आयोजन ४ जुलै रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन येथे करण्यात आले. सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. शंकर खोब्रागडे होते. सभेची सुरुवात तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून करण्यात आली. बौद्धाचार्य देविदास राऊत यांनी त्रिशरण, पंचशील, बुद्धवंदना व आनापानसतीचा अभ्यास घेतला, तर उदारामजी मेश्राम यांनी २२ प्रतिज्ञांचे वाचन केले. बौद्धाचार्य प्रकाश सोनटक्के यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २८ जून ते ४ जुलै या कालावधीतील कार्याचा आढावा घेतला. देविदास राऊत यांनी महामंगल सुत्ताचे मराठी भाषांतर आणि धम्माचे महत्त्व स्पष्ट केले. ज्ञानेश्वर वाकडे यांनी वाढदिवस असलेल्या धम्मसेवक-धम्मसेविकांचा सत्कार केला, तर संजीव गाडे यांनी उपवर्गीकरण आणि समाजकल्याण विभागाशी संबंधित विषयांवर विचार मांडले.प्रमुख अतिथी ई.झेड. खोब्रागडे यांनी त्यांच्या 'स्वर संविधानाचे' या पुस्तकाची माहिती देत संविधानाच्या उद्देशिकेतील संकल्पनांचे सोपे स्पष्टीकरण केले. तसेच कलम १९ अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संविधान फाउंडेशन उपक्रम आणि शाळांमध्ये संविधान उद्देशिकेचे नियमित वाचन करण्यावर त्यांनी भर दिला. अध्यक्षीय समारोपात डॉ. शंकर खोब्रागडे यांनी केला. उदाराम मेश्राम यांनी संचालन, संजीव गाडे यांनी आभार प्रदर्शन केले. समारोप गाथा व प्रतिज्ञा मंगला राऊत यांनी घेतली, तर राष्ट्रगीत अरुणा पाटील, वर्षा टेंभेकर आणि प्रा. नंदा भगत यांनी सादर केले. अल्पोपहाराची व्यवस्था रविंद्र हुमणे यांनी केली.



# थायलंडमधील बौद्ध भिक्खूंना आदरांजली

## स्मार्ट मीटरविरोधात बसपाची जनजागृती रॅली

**नागपूर :** ग्राहकांची संमती न घेता स्मार्ट मीटर आणि प्रीपेड मीटर बसविण्याच्या विरोधात बहुजन समाज पक्षाने (बसपा) रविवारी दक्षिण नागपुरात जनजागृती रॅली काढून सरकारच्या धोरणाचा निषेध केला. यावेळी थायलंडमध्ये मृत्युमुखी पडलेल्या नऊ बौद्ध भिक्खूंना श्रद्धांजलीही अर्पण करण्यात आली. बसपाचे शहराध्यक्ष अनिकेत कुत्तरमारे यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीला बसपा नेते उत्तम शेवडे, रंजना ढोरे, चंद्रशेखर कांबळे, सहदेव पिल्लेवान आणि भीमराव गजभिये यांचे मार्गदर्शन लाभले. 'संडे इज अ मिशन डे' या उपक्रमांतर्गत नागरिकांमध्ये स्मार्ट मीटरबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी बसपा पदाधिकाऱ्यांनी राज्यातील सुमारे चार लाख ग्राहकांनी स्मार्ट मीटरविरोधात अधिकृत तक्रारी केल्याचा दावा करत, विधानसभेत ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी याची दखल घेतल्याचा उल्लेख केला. स्मार्ट मीटरमुळे वीजबिले वाढत असल्याच्या तक्रारी, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आणि ग्राहकांच्या हिताकडे दुर्लक्ष करून महसूल वाढविण्यावर भर दिला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. स्मार्ट मीटर व प्रीपेड मीटरबाबत सर्वसामान्य ग्राहकांमध्ये पुरेशी माहिती नसतांना त्यांची सक्ती करणे हे अन्यायकारक आणि असंवैधानिक असल्याचे मतही बसपा नेत्यांनी व्यक्त केले. रॅलीदरम्यान चंद्रमणी नगर येथील महाथेरो गुरु चंद्रमणी बुद्ध विहारात थायलंडमध्ये मृत्युमुखी पडलेल्या नऊ बौद्ध भिक्खूंना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या रॅलीत किरण गौरखेडे, रंजना घरडे, प्रवीण पाटील, नितीन वंजारी, बालचंद्र जगताप, दिलीप गजघाटे, संभाजी लोखंडे, अशोक रंगारी, जगदीश गेडाम, राहुल टेंभरे, भानुदास ढोरे, सुमित जांभुळकर, हेमंत बोरकर, शामराव तिरपुडे, नितेश घुटके, रामकृष्ण ढोके, गजानन मेश्राम, निरंजन पिंपोले, धम्मपाल वाळके, पियुष मेश्राम आणि किशोर बहादुरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## निधन वार्ता

### नरेश नारायण डोंगरे



**नागपूर :** रजा टाऊन, म्हसाळा, कामठी रोड, नागपूर येथील रहिवासी तथा सेवानिवृत्त वरिष्ठ लेखापरीक्षक नरेश नारायण डोंगरे (वय ७७) यांचे रविवारी (दि. ५ जुलै) आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर रविवारी वैशाली घाट, नागपूर येथे अंत्यसंस्कार केले. डोंगरे यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि आप्तपरिवार असा मोठा परिवार आहे.

# 5 मिनिटांत मदत, गोंदियाहून नेपाळपर्यंत पोहोचली माणुसकी




**गोंदिया :** गोंदिया पोलीस ठाण्यातून पोलीस मित्र आदेश शर्मा यांना माहिती मिळाली की, सुमारे 18 वर्षीय सविन हा षदानंद नगरपालिका, भोजपूर (कोशी प्रदेश), नेपाळ येथील रहिवासी असून, तो कुटुंबीयांवर रागावून घर सोडून निघून गेला होता.

तो प्रथम दिल्लीला गेला, त्यानंतर काही काळ सिकंदराबाद येथे काम केले. मात्र, काही दिवसांतच त्याला आई-वडील आणि कुटुंबाची साथ हीच आयुष्यातील सर्वात मोठी ताकद असल्याची जाणीव झाली.

घरी परतत असताना रेल्वे प्रवासादरम्यान त्याचे पाकीट आणि मोबाईल चोरीला गेले. त्यामुळे त्याच्याकडे पैसे उरले नाहीत आणि तो विनातिकीट प्रवास करत होता. यामुळे त्याला गोंदियातील भीमनगर चौकीजवळ रेल्वेतून उतरविण्यात आले.

भटकत असताना त्याची भेट अंगणवाडी सेविका लोभा ताई बौद्ध यांच्याशी झाली. त्यांनी त्याची संपूर्ण व्यथा ऐकून घेतली, त्याला जेवण दिले तसेच परिसरातील नागरिकांकडून ₹600 ची मदत जमा केली. त्यानंतर त्या त्याला गोंदिया पोलीस ठाण्यात घेऊन गेल्या.

या प्रकरणात गोंदिया पोलीस विभागातील कवलपालसिंग भाटिया आणि सुदेश टेंभरे यांनी तत्परता दाखवत आवश्यक कार्यवाही केली आणि पोलीस मित्र आदेश शर्मा यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर गोंदिया विधानसभा ग्रुपचे सदस्य आदेश शर्मा, रेल्वे कमिटी चे पूर्व सदस्य हर्षल पवार आणि विजय अग्रवाल पोलीस ठाण्यात पोहोचले. सत्य परिस्थिती समजल्यानंतर सविन साठी बॅगची व्यवस्था करण्यात आली तसेच त्याच्या रेल्वे तिकीट व प्रवास खर्चासाठी ₹3,000 मदतीचे आवाहन करण्यात आले.

माणुसकीचे जिवंत उदाहरण म्हणजे, अवघ्या 5 मिनिटांत 6 ते 7 सहकाऱ्यांनी संपूर्ण रक्कम जमा केली.

दुसऱ्या दिवशी सविनला जेवण व प्रवासासाठी टिफिन देऊन आदेश शर्मा, हर्षल पवार, विजय अग्रवाल आणि राज गजभिये यांनी त्याला रेल्वे स्थानकावर नेले व RPF चे लाडे सर यांच्या स्वाधीन केले. लाडे सर यांनी त्याचे प्रेमाने स्वागत करून आपल्या केबिनमध्ये बसविले आणि रात्री 12.30 वाजता दानापूर स्पेशल ट्रेनमध्ये स्वतः त्याला सुरक्षितपणे बसवून देण्याचे आश्वासन दिले.

आता सविन आपल्या घराकडे, आपल्या कुटुंबाकडे परत निघाला आहे. लवकरच तो आपल्या आई-वडिलांच्या सान्निध्यात पोहोचेल, अशी आशा आहे.

या संपूर्ण घटनेतून सविनला एक महत्त्वाचा धडा मिळाला—जग कुठेही घेऊन जावो, पण आई-वडील आणि कुटुंबाची साथ हीच सर्वात सुरक्षित आणि सर्वात आनंददायी आश्रय असते.

या सेवाकार्याची सुरुवात अंगणवाडी सेविका लोभा ताई बौद्ध यांच्या संवेदनशीलतेतून झाली आणि गोंदिया पोलीस, RPF तसेच गोंदिया विधानसभा ग्रुप यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे या कार्याचा सुखद शेवट

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648